नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : २३३ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




गुरुवार, दि. ०६ ऑगस्ट २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## थोडक्यात...



### जलद निपटाऱ्यासाठी विशेष खंडपीठ

मुंबई (स. गांवकरी) : राज्यात ज्या प्रकरणांमध्ये मूळ मालकांच्या किंवा खाजगी मालकीच्या जमिनींवर वक्फ बोर्डाच्या नोंदी झाल्याबाबत वाद निर्माण झाले आहेत, अशा प्रकरणांची वस्तुस्थिती तपासून त्यांचा जलद आणि प्रभावी निपटारा करण्यासाठी सर्व विभागीय आयुक्तांच्या सदस्यतेखाली विशेष खंडपीठ स्थापन करण्याचे आदेश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी बुधवारी दिले. नाशिक जिल्ह्यातील कळवण–सुरगाणा मतदारसंघातील मौजे दरेभणगी येथील आदिवासी शेतकऱ्यांच्या जमिनीवर झालेल्या वक्फ बोर्डाच्या नोंदीच्या प्रकरणाच्या आढावा बैठकीत बावनकुळे बोलत होते. बैठकीस आमदार नितीन पवार, नाशिकचे जिल्हाधिकारी उपस्थित होते. कळवण–सुरगाणा मतदारसंघातील मौजे दरेभणगी येथील आदिवासी शेतकऱ्यांच्या जमिनीवर झालेल्या वक्फ बोर्डाच्या नोंदींची वस्तुस्थिती तातडीने तपासून बेकायदेशीर नोंदी असल्यास त्या कमी करण्याची आणि कायद्यानुसार पुढील कार्यवाही करण्याचे आदेशही महसूल मंत्र्यांनी दिले. अशा स्वरूपाची प्रकरणे केवळ नाशिकपुरती मर्यादित नसून राज्यातील इतर भागातही आढळून येत असल्याने त्यांचा वेळेत आणि एकसमान पद्धतीने निपटारा व्हावा, यासाठी विशेष खंडपीठ स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला.

# दुसऱ्या टप्प्यातही जातगणना नाही?

## ‘ओबीसी’ नोंदीचा उल्लेख नसल्याने संभ्रम; केंद्राकडून स्पष्टीकरणाची मागणी

नागपूर : (स. गांवकरी)

केंद्र सरकारने हिमाच्छादित प्रदेश असलेल्या राज्यांतील जनगणनेच्या दुसऱ्या टप्प्याची अधिसूचना जारी केली आहे. मात्र यात जातनिहाय जनगणनेचा स्पष्ट उल्लेख नसून इतर मागासवर्गीयांच्या (ओबीसी) स्वतंत्र नोंदीबाबतही भाष्य नाही. त्यामुळे जनगणनेच्या राष्ट्रव्यापी दुसऱ्या टप्प्यातही जातनिहाय गणना होणार की नाही, याविषयी संभ्रम निर्माण झाला आहे. या मुद्द्यावर ओबीसी संघटना आक्रमक होऊ लागल्या असून केंदाकडून स्पष्टीकरणाची मागणी करण्यात येत आहे.

जनगणनेचा कार्यक्रम जाहीर करताना जातनिहाय गणनेबाबत कोणतीही घोषणा करण्यात आली नव्हती. त्याचे पडसाद विविध पक्ष आणि सामाजिक संघटनांमध्ये उमटले होते. विशेषत: ओबीसींची नोंद स्वतंत्र करून त्याची आकडेवारी समोर आणली जावी, अशी मागणी आग्रहाने केली जात होती. हा दबाव वाढल्यानंतर केंद्राने जातनिहाय गणना करण्याचे जाहीर केले. जनगणनेच्या पहिल्या टप्प्यात घरगणना



आणि दुसऱ्या टप्प्यात जातीनिहाय माहिती संकलित केली जाईल, असे सरकारने स्पष्ट केले होते. त्यानंतरही पहिल्या टप्प्यातील डिजिटल अर्जात ओबीसी जात नोंदीसाठी स्वतंत्र रकाना नसल्याबद्दल विरोधकांनी टीका केली होती. त्या वेळी दुसऱ्या टप्प्यात जातनिहाय नोंद करण्याची व्यवस्था करण्याचे सरकारने मान्य केले होते. मात्र दुसऱ्या टप्प्यातील अधिसूचनेत त्याबद्दल उल्लेख नाही.

केंद्रीय गृह मंत्रालयाने ३ ऑगस्ट २०२६ रोजी लडाख, जम्मू-काश्मीरमधील हिमाच्छादित असमकालिक क्षेत्रे तसेच हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमधील बर्फाच्छादित व दुर्गम भागांसाठी प्रसिद्ध करण्यात आलेल्या दुसऱ्या टप्प्याच्या अधिसूचनेत जनगणनेचे वेळापत्रक आणि प्रशासकीय प्रक्रिया यांचा उल्लेख आहे. मात्र जातनिहाय जनगणना किंवा ओबीसींची स्वतंत्र माहिती संकलित करण्याबाबत उल्लेख करण्यात आलेला नाही. त्यामुळे सरकारच्या भूमिकेबाबत संभ्रम निर्माण झाला आहे.

सकल ओबीसी महामोर्चाने केंद्र सरकारने पुन्हा एकदा ओबीसी समाजाची दिशाभूल केल्याचा आरोप केला असून, आवश्यक स्पष्टीकरण न मिळाल्यास आंदोलन छेडण्याचा इशाराही दिला आहे.

### मंत्रिमंडळाचा निर्णय; भुजबळांना उत्तर

पहिल्या टप्प्यातील घरगणनेत ओबीसींसाठी स्वतंत्र रकाना नसल्याने वाद निर्माण झाला होता. त्यानंतर केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी ३० एप्रिल २०२५ रोजी मंत्रिमंडळाच्या निर्णयाची माहिती देताना दुसऱ्या टप्प्यात जातनिहाय जनगणना केली जाईल, असे स्पष्ट केले होते. तसेच राज्याचे अन्न, नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ यांनी या संदर्भात लिहिलेल्या पत्राला उत्तर देताना केंद्रीय गृह राज्यमंत्री नित्यानंद राय यांनीही त्याची पुष्टी केली होती.

### आता प्रश्नावलीकडे लक्ष

दुसऱ्या टप्प्यातील जनगणना अधिसूचनेत केवळ जनगणनेचा उल्लेख व वेळापत्रक नमूद आहे. त्यामुळे आता प्रत्यक्ष जनगणनेसाठी तयार होणाऱ्या प्रश्नावलीत अनुसूचित जाती-जमातींसोबत ओबीसींसाठी स्वतंत्र रकाना ठेवला जाणार का, याकडे लक्ष लागले आहे.

## तटकरेंनी धनंजय मुंडेंना फटकारले

मुंबई : (स. गांवकरी)

ज्यांच्या नावाने पत्रकार परिषद बोलावलेली असते, त्यांनी पत्रकार परिषदेत संबांधणे अपेक्षीत असते. मंत्र्यांच्यासोबतच्या नेत्यांनी या राजशिष्टाचाराचे पालन करायला हवे. इतरांनी पत्रकार परिषदेत हस्तक्षेप करणे, परस्पर उत्तर देणे चुकीचे आहे, या शब्दात राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी पक्षाचे आमदार धनंजय मुंडे यांना फटकारले आहे. बीड जिल्ह्यात उपमख्यमंत्री तथा पालकमंत्री सुनेत्रा पवार दौऱ्यावर असताना. जिल्ह्यातील कायदा व सुव्यस्थेसंदर्भात पत्रकारांनी प्रश्न विचारला होता. शेजारी बसलेल्या धनंजय मुंडे यांनी हस्तक्षेप केला. मुंडेंनी प्रश्नकर्त्या पत्रकाराला रोखले आणि पत्रकार परिषद थांबवली. यासदंर्भातली दृश्यचित्रफीत समाजमाध्यमावर प्रसारित झाली होती.



त्यावर प्रदेश काँग्रेसने सुनेत्रा पवार यांना ‘गुंगी गुडिया’ संबोधले. सपकाळ यांच्या वक्तव्याच्या निषेधार्थ राष्ट्रवादीचे कार्यकर्ते राज्यभरात दोन दिवस आंदोलन करत आहेत. मंत्र्यासोबतच्या पदाधिकाऱ्यांनी पत्रकार परिषदेत शिष्टाचाराचे भान ठेवले पाहिजे. यापुढे आमचे कार्यकर्ते जबाबदारीने वागतील, असे तटकरे म्हणाले. हर्षवर्धन सपकाळ यांची आमच्या राष्ट्रीय नेत्यांवरील टीका योग्य नव्हती. काँग्रेसने आपली वैचारिक दिवाळखोरी दाखवली आहे.

# जनआरोग्य योजनेत १५ हजार ४०७ उपचारांचे दावे संशयास्पद

## एसआयटीमार्फत होणार चौकशी

मुंबई : (स. गांवकरी)

विस्तारित आयुष्मान भारत-पंतप्रधान जनआरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेच्या अंतर्गत २०२४ ते २०२६ या कालावधीत १५ हजार ४०७ उपचारदावे संशयित आढळले आहेत. या दाव्यांची सखोल चौकशी करण्यासाठी विशेष चौकशी पथक (एसआयटी) गठित करण्यात आले असून हे पथक महिनाभरात आपला अहवाल सादर करणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली १० जुलै रोजी विधानभवनात पार पडलेल्या बैठकीत आयुष्मान भारत-पंतप्रधान जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेचा आढावा घेण्यात आला. या बैठकीत भाजपचे आमदार राहुल आहेर यांनी नाशिक जिल्ह्यात महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत झालेल्या कथित गैरव्यवहाराची सविस्तर माहिती दिली. त्यावेळी मुख्यमंत्र्यांनी एसआयटी नेमण्याची घोषणा केली होती.

यापूर्वी या योजनांमधील संशयास्पद दाव्यांची लाभार्थ्यांना प्रत्यक्ष भेटून पडताळणी करण्याचे आदेश जिल्हा शल्यचिकित्सक आणि जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांना देण्यात आले होते. मात्र, कथित गैरव्यवहाराचे स्वरूप अनेक जिल्ह्यांमध्ये असल्याचे प्राथमिक तपासात समोर आल्याने स्वतंत्र एसआयटीमार्फत व्यापक चौकशी करण्याचा निर्णय सरकारने घेतला.

नाशिक विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या एसआयटीत सदस्य म्हणून सार्वजनिक आरोग्य विभागाचे सचिव ई. रविंद्रन , माहिती आणि तंत्रज्ञान विभागाचे



सचिव वीरेंद्र सिंह, नाशिक शहर सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक, नाशिक शहर आर्थिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस आयुक्त यांचा समावेश आहे. तर आरोग्य विभागाचे उपसचिव हे या समितीचे सदस्य सचिव असतील. वैद्यकीय शिक्षण विभागातील तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शनही या पथकाला उपलब्ध करून दिले जाणार आहे. सदर एसआयटी रुग्णालय स्तरावरील बनावट अथवा वैद्यकीयदृष्ट्या अनावश्यक उपचार दावे, उपचार प्रक्रियेचे अवाजवी श्रेणीवर्धन, रुग्णालयांच्या अंगीकरण आणि नूतनीकरण प्रक्रियेतील अनियमितता, संशयास्पद रुग्ण नोंदणी, एकाच मोबाईल क्रमांक किंवा ओळखपत्रावर अनेक दावे दाखल करणे तसेच तृतीय पक्ष संस्था (टीपीए), जिल्हा समन्वयक किंवा इतर संबंधित घटकांचा संभाव्य सहभाग अशा विविध बाबींची तपासणी पथकाकडून होणार आहे. याशिवाय दावे मंजुरीची प्रक्रिया, नियंत्रण यंत्रणा आणि रुग्णालयांच्या अंगीकरण प्रक्रियेतील त्रुटींचा अभ्यास करून भविष्यात अशा प्रकारचे गैरव्यवहार रोखण्यासाठी आवश्यक सुधारणा सुचविण्याची जबाबदारीही एसआयटीवर सोपविण्यात आली आहे.



# भोंदू राजेंद्र गडगेच्या अडचणीत मोठी वाढ

## पीसीपीएनडीटी कायद्यान्वये न्यायालयात तक्रार, अन्न व औषध प्रशासनाकडूनही कारवाईची तयारी!

तपास यंत्रणांच्या माहितीनुसार, सामाजिक माध्यमांवर असाध्य आजार बरे करण्याच्या आणि पुत्रप्राप्तीची हमी देणाऱ्या जाहिराती करून अनेक रुग्ण व त्यांच्या कुटुंबीयांना आकर्षित करण्यात येत होते. त्यातून आर्थिक फसवणूक झाल्याचे आरोपही समोर आले आहेत. आता न्यायालयीन प्रक्रिया, आरोग्य विभागाची कारवाई आणि अन्न व औषध प्रशासनाच्या संभाव्य गुन्ह्यामुळे राजेंद्र गडगेभोवती कायद्याचा फास अधिक घट्ट होत असल्याची चर्चा संगमनेर तालुक्यात रंगू लागली आहे.

संगमनेर : (स. गांवकरी)




संगमनेर तालुक्यातील वडगावपान येथील तथाकथित 'दत्तधाम सरकार'चा सूत्रधार राजेंद्र बापू गडगे याच्या अडचणीत दिवसेंदिवस वाढ होत असून, महाराष्ट्र नरबळी व इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा आणि जादूटोणा प्रतिबंधक कायद्यान्वये दाखल गुन्ह्यात जामिनावर सुटका झाल्यानंतर आता त्याच्याविरोधात गर्भधारणापूर्व व प्रसूतीपूर्व निदान तंत्र (पीसीपीएनडीटी) कायद्यान्वये न्यायालयात तक्रार दाखल करण्यात आली आहे. घुलेवाडी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. राजकुमार जहाड यांनी संगमनेर येथील दिवाणी न्यायालयात ही तक्रार दाखल केली असून, न्यायालयीन प्रक्रियेनंतर गडगेच्या अडचणीत आणखी वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. याचबरोबर पोलिसांच्या कारवाईदरम्यान जप्त करण्यात आलेल्या औषधसाठ्याच्या आधारे जिल्हा अन्न व औषध प्रशासनानेही स्वतंत्र कारवाईची तयारी सुरू केली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून वडगावपान येथे 'दत्तधाम सरकार'च्या नावाखाली राजेंद्र गडगे आणि त्याच्या सहकाऱ्यांकडून कर्करोगासह विविध असाध्य आजारांवर मंत्रविद्येद्वारे उपचार होत असल्याचे दावे केले जात होते. या दाव्यांचा प्रचार करण्यासाठी आधुनिक स्टुडिओ उभारून सामाजिक माध्यमांवर व्हिडिओ प्रसारित केले जात होते. या माध्यमातून राज्यभरातील गंभीर आजारांनी त्रस्त रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांमध्ये आशा निर्माण करून त्यांना आश्रमात बोलावले जात असल्याचा आरोप आहे. त्यानंतर विविध धार्मिक विधींच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर आर्थिक व्यवहार होत असल्याची माहिती तपासातून समोर आली होती. या प्रकरणाचा काही धाडसी पत्रकारांनी पर्दाफाश केल्यानंतर संगमनेर तालुका पोलिसांनी एप्रिल महिन्यात राजेंद्र गडगेसह अन्य दोघांविरोधात जादूटोणा प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करून अटक केली होती. या कारवाईदरम्यान आश्रमाची झडती घेताना मोठ्या प्रमाणात औषधांचा साठाही पोलिसांना आढळून आला होता. या औषधसाठ्याच्या वैधतेबाबत आता जिल्हा अन्न व औषध प्रशासनाने स्वतंत्र चौकशी सुरू केली असून, नियमभंग आढळल्यास संबंधित कायद्यांनुसार गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे संकेत मिळत आहेत. दरम्यान, लेक लाडकी अभियानाच्या राज्य संयोजक वर्षा देशपांडे यांनी राजेंद्र गडगेच्या सामाजिक माध्यमांवरील व्हिडिओंचे पुरावे सादर करून त्याच्याविरोधात पीसीपीएनडीटी कायद्यान्वये कारवाईची मागणी आरोग्य विभागाकडे केली होती. त्यानंतर जिल्हा शल्यचिकित्सकांनी चौकशीचे आदेश दिले. चौकशीत गडगेने असाध्य आजार बरे करण्याच्या दाव्यांसोबतच "हमखास कृष्णासारखा मुलगा होईल" अशा स्वरूपाचे पुत्रप्राप्तीचे दावे सार्वजनिकरीत्या केल्याचे व्हिडिओ समोर आले. या पुराव्यांच्या आधारे डॉ. राजकुमार जहाड यांनी न्यायालयात तक्रार दाखल केली आहे. तक्रारीतील माहितीनुसार, गडगेने आपल्या कथित आश्रमात अनेकांच्या उपस्थितीत एका कुटुंबाला पुत्रप्राप्तीची खात्री देणारे दावे केले होते. संबंधित व्हिडिओंची पडताळणी करूनच न्यायालयीन प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे पीसीपीएनडीटी कायद्याअंतर्गत त्याच्यावर स्वतंत्र कारवाई होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. यापूर्वी अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या राज्य संयोजक रंजना गवांदे-पगार यांच्या तक्रारीनंतर पोलिसांनी जादूटोणा प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल केला होता. या प्रकरणातील मुख्य सूत्रधार मानला जाणारा आणि सिन्नर येथे औषधनिर्मितीचा कारखाना चालवणारा 'शिवधाम सरकार'चा संचालक डॉ. मोहन पुरी अद्याप फरार असल्याचे सांगितले जाते. दरम्यान, राजेंद्र गडगे आणि त्याच्या दोघा सहकाऱ्यांना नियमित जामीन मिळाल्यानंतर त्यांची कारागृहातून सुटका झाली होती. मात्र आता पीसीपीएनडीटी कायद्याअंतर्गत न्यायालयीन कारवाई आणि अन्न व औषध प्रशासनाच्या प्रस्तावित कारवाईमुळे त्याच्या अडचणी पुन्हा वाढल्या आहेत.

# थोडक्यात पण महत्वाचे



## सी.पी. गोयंका इंटरनॅशनल स्कूलमध्ये इन्व्हेस्टिचर समारंभ उत्साहात संपन्न!

ठाणे (स. गांवकरी) : सी.पी. गोयंका इंटरनॅशनल स्कूलच्या सभागृहात १ ऑगस्ट रोजी शैक्षणिक वर्ष २०२६–२७ साठीचा इन्व्हेस्टिचर समारंभ उत्साहपूर्ण व दिमाखदार वातावरणात पार पडला. विद्यार्थी परिषदेला पदभार सोपविण्यासाठी आयोजित या समारंभात विद्यार्थ्यांनी नेतृत्व, शिस्त आणि जबाबदारीची शपथ घेत शाळेच्या परंपरेला साजेसा उत्साह निर्माण केला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या प्राचार्या सौ. शर्मिला मादीवाले उपस्थित होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून श्री. नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला, श्री. संदिप गोयंका, सौ. अर्चना गोयंका, सौ. अमिता परेश ठक्कर, सौ. जयश्री कुमार यांची उपस्थिती लाभली. दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. विद्यार्थी परिषदेच्या नव्याने निवडून आलेल्या सदस्यांना पदभार, बॅज व सॅश प्रदान करण्यात आले तसेच प्राचार्यांनी सर्व पदाधिकाऱ्यांना शपथ दिली. यावेळी गाया, हेफेस्टस, पोसायडन आणि झ्यूस या चारही हाऊसच्या कॅप्टन, उपकॅप्टन व इतर पदाधिकाऱ्यांचाही गौरव करण्यात आला. प्रमुख पाहुणे श्री. नानजीभाई ठक्कर यांनी विद्यार्थ्यांना नेतृत्वगुण, प्रामाणिकपणा, शिस्त, सेवाभाव आणि सामाजिक जबाबदारीचे महत्त्व पटवून देत आदर्श विद्यार्थी नेते बनण्याचे आवाहन केले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्या सौ. शर्मिला मादीवाले यांनी विद्यार्थी परिषद ही केवळ सन्मानाचे पद नसून जबाबदारीची जाणीव करून देणारी संधी असल्याचे सांगितले. नेतृत्व, संघभावना, आत्मविश्वास आणि सेवाभाव या गुणांचा विकास अशा उपक्रमांतून होत असल्याचे त्यांनी नमूद केले आणि सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या यशस्वी कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

## विधीसंकल्प पॅनेलची सत्ता; ॲड. संतोष पाटील अध्यक्षपदी विजयी



सोलापूर (स. गांवकरी) : सोलापूर बार असोसिएशनवर विधीसंकल्प पॅनेलची सत्ता आली असून या पॅनेलचे वकील ॲड. संतोष पाटील अध्यक्षपदी विजयी झाले आहेत. सोलापूर बार असोसिएशनच्या अत्यंत प्रतिष्ठेच्या निवडणुकीत विधीसंकल्प पॅनेलने निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित करत सर्व पदांवर विजय मिळवला आहे. अध्यक्षपदी ॲड. संतोष पाटील यांनी विजय मिळवला असून त्यांच्या पॅनेलने उपाध्यक्ष, सचिव आणि खजिनदार ही महत्त्वाची पदेही त्यांच्याच पॅनल ला मिळाली आहेत. अध्यक्षपदासाठी ॲड. संतोष पाटील यांनी विजय मिळवला आहे. तर उपाध्यक्ष (खुला गट) म्हणून ॲड. परमानंद जवळकोटे, महिला उपाध्यक्ष म्हणून ॲड. शर्मिला देशमुख, सचिव म्हणून ॲड. जयप्रकाश भंडारे, सहसचिव म्हणून ॲड. प्रियंका गोरंटी आणि खजिनदार म्हणून ॲड. सिद्धराम पाटील हे विजयी झाले आहेत..सोलापूर बार असोसिएशन मध्ये बऱ्याच वर्षांपासून सत्तांतर झाले नव्हते परंतु यावेळी प्रथमच सत्तांतर होऊन विद्यमान अध्यक्ष यांचा पराभव झाला आहे. माजी अध्यक्ष ॲड राजेद्र फताटे हे पराभूत झाले आहेत.

## महेश इंगळे, प्रथमेश इंगळे यांच्या हस्ते आदित्य गवंडी याचा सत्कार



अक्कलकोट (स. गांवकरी) : येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे कर्मचारी श्रीशैल गवंडी यांचे चिरंजीव आदीत्य गवंडी याचा १८ वा वाढदिवस वटवृक्ष स्वामी मंदिरात उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी मंदीर समितीचे चेअरमन महेश इंगळे-प्रथमेश इंगळे यांनी श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, शाल, हार घालून आदित्य गवंडी याचा सत्कार केला. वाढदिवसानिमित्त आदित्य गवंडी यांनी स्वामींचे व मंदीर समितीचे चेअरमन महेश मालक इंगळे यांच्या चरणी नतमस्तक होत दर्शन घेऊन आशीर्वाद घेतले. स्वामींच्या कृपेने आदित्य यांच्या आयुष्यातील प्रत्येक दिवस सुख, समृद्धी आणि यशाचा जावो अशी प्रार्थना यावेळी अशी प्रार्थना या वेळी मंदीर समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी केली. यावेळी प्रथमेश इंगळे, युवराज सोनटक्के, ओंकार महाडीक, तन्मय इचगे, तुषार मोरे, समर्थ स्वामी इत्यादी उपस्थित होते.

## टाकेद ते वासाळी रस्ता दुरुस्ती करून चालू न झाल्यास तीव्र आंदोलन

इगतपुरी (स. गांवकरी) : इगतपुरी तालुक्यातील टाकेद गटातील टाकेद ते वासाळी,टाकेद ते अधरवड,टाकेद ते म्हैसवळण घाट या मुख्य रस्त्यावर पडलेल्या मोठं मोठ्या भल्यामोठ्या जीवघेण्याखड्डयामुळे गेल्या काही दिवसांत अनेक वाहने आदळून गंभीर अपघात झाले आहेत. वाहनचालक व पादचारी जिव मुठीत धरून या रस्त्यावरून प्रवास करत आहेत. त्यात ठेकेदारांच्या दुर्लक्ष पणामुळे टाकेद वासाळी रस्ता गेल्या दोन महिन्यांपासून बंद आहे मात्र, वारंवार तक्रारी करूनही संबंधित सार्वजनिक बांधकाम विभाग (PWD) या खड्डयाकडे रस्ता प्रश्नांकडे दुर्लक्ष करत असून, नागरिकांच्या जीवाशी खेळत असल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे.

## रेल्वे मार्गासाठी क्रांतिदिनी 'एल्गार' !

नारायणगाव : (स. गांवकरी)




पुणे नाशिक रेल्वेचा प्रस्तावित मार्ग बदलल्यामुळे जुन्नर,आंबेगाव, खेड आणि संगमनेर तालुक्यातील सर्वसामान्य नागरिक संतप्त झाले आहेत.यापूर्वी पुणे भोसरी चाकण राजगुरुनगर नारायणगाव आळेफाटा संगमनेर अशा पद्धतीने रेल्वे मार्गाला तत्वतः मंजुरी देण्यात आली होती.त्यानंतर रेल्वे मंत्रालयाने दोन वेळा सर्वेक्षण केले.काही जमिनींचे अधिग्रहण करून जमीन मालकांना भरपाईही देण्यात आली. मात्र त्यानंतर नारायणगावजवळील खोडद येथे असलेल्या 'जी एम आर टी' या महाकाय दुर्बीण प्रकल्पाच्या व्यवस्थापनेने या प्रस्तावित रेल्वे मार्गास विरोध केल्यामुळे अखेर केंद्र सरकारने हा मार्ग बदलून शिर्डी मार्गे नेण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळेच खेड, आंबेगाव,जुन्नर व संगमनेर या तालुक्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.जी एम आर टी' प्रकल्पामुळे जुन्नर आंबेगाव तालुक्यात 'एमआयडीसी' होऊ शकत नाही, उद्योगधंदे येऊ शकत नाहीत, त्यामुळे या दोन तालुक्यात तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होत नाहीत.येथील तरुणांना रोजगार मिळवण्यासाठी पुणे नाशिक मुंबई आदी शहरांकडे जावे लागते.मात्र रेल्वेमार्ग झाल्यास येथील विकासाला चालना मिळू शकेल, शेतमालाला योग्य बाजारपेठ मिळू शकेल, तसेच तरुणांच्या हाताला काम मिळू शकेल, अशा प्रकारची भावना जुन्नर आंबेगाव तालुक्यातील नागरिकांमध्ये आहे. मात्र हा प्रकल्प दोन वेळा मंजूर होऊनही अखेर शिर्डी मार्गे नेल्यामुळे आता या सर्व तालुक्यातील नागरिक शेतकरी वर्ग आंदोलनाच्या पावित्र्यात आहे. या संदर्भात दिशा ठरविण्यासाठी नारायणगाव येथील मुक्ताई मंदिर सभागृहात काल रात्री सर्वपक्षीय बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

## "जय भगवान" तिरंगा वृद्धाश्रमाला नानजीभाई ठक्कर यांची सदिच्छा भेट; ज्येष्ठांना व्यसनमुक्त व सकारात्मक जीवनाचा संदेश!

गोंडल (राजकोट) : (स. गांवकरी)



दानशूर समाजसेवक श्री. नानजीभाई खीमजीभाई ठक्कर (ठाणावाला) यांनी राजकोट जिल्ह्यातील गोंडल तालुक्यातील चरखडी येथील "जय भगवान" तिरंगा वृद्धाश्रमाला सदिच्छा भेट देऊन तेथील ज्येष्ठ नागरिकांशी संवाद साधला. सेवा, सत्संग आणि मानवतेचा संदेश देणाऱ्या या भेटीत त्यांनी आश्रमातील ज्येष्ठांना व्यसनमुक्त राहून सकारात्मक विचारांनी जीवन जगण्याचे आवाहन केले. यावेळी आश्रमाचे संचालक श्री. रसिकभाई व श्री. जगदीशभाई यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच श्री. नानजीभाई ठक्कर आणि श्री. अर्जुनभाई गोहेल यांचाही आश्रमाच्या वतीने सन्मान करण्यात आला. सध्या तिरंगा वृद्धाश्रमात सुमारे २१० ज्येष्ठ नागरिक वास्तव्यास आहेत. त्यांच्यासमवेत आयोजित सत्संगात मार्गदर्शन करताना नानजीभाई ठक्कर म्हणाले, "आश्रमात राहणाऱ्या प्रत्येक ज्येष्ठाने कोणत्याही प्रकारचे व्यसन करू नये आणि नेहमी सकारात्मक विचारांनी जीवन जगावे." यावेळी अहमदाबादहून आलेल्या भाविकांसोबतही सत्संगाचे आयोजन करण्यात आले. "मी संपूर्ण भारतभर प्रवास करतो; मात्र इतके प्रेमळ, सेवाभावी आणि आत्मीयतेचे वातावरण इतरत्र क्वचितच अनुभवायला मिळते," असे गौरवोद्गार त्यांनी काढले.

धनलक्ष्मीबेन नानजीभाई यांच्या सहकार्याने वृद्धाश्रमाला २ लाख ११ हजार रुपये किमतीचे पोळी (रोटी) बनविण्याचे मशीन भेट देण्यात आले. या यंत्रामुळे आश्रमाच्या दैनंदिन कामकाजात मोठी सुविधा उपलब्ध होणार आहे. तसेच श्री. नानजीभाई खीमजीभाई ठक्कर (एन.के.टी.) यांच्या वतीने आश्रमातील ज्येष्ठांना "जय भगवान" लिहिण्यासाठी वह्यांचे वितरण करण्यात आले. याशिवाय दहा गरजू ज्येष्ठांना मूळव्याध उपचारासाठी आवश्यक औषधांचे वाटप करण्यात आले.

ज्येष्ठ नागरिकांशी संवाद साधताना अनेकांनी "येथे आम्हाला घरापेक्षाही अधिक प्रेम, सन्मान आणि आनंद मिळतो," अशी भावना व्यक्त केली. त्यानंतर श्री. अर्जुनभाई गोहेल यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व मान्यवरांनी वीरपूर येथील श्री जालाराम मंदिरात दर्शन घेऊन आशीर्वाद प्राप्त केले. मंदिराच्या अन्नक्षेत्रात महाप्रसादाचा लाभ घेतला. यावेळी मंदिराचे पुजारी श्री. महेशभाई यांनी उपस्थितांचे स्वागत करून महाप्रसादाची व्यवस्था केली. सेवा, सत्संग, सन्मान आणि मानवतेचा संदेश देणारा हा कार्यक्रम अत्यंत भावपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

## नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने प्राधिकृत अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांच्या कार्यकाळात साधली उल्लेखनीय प्रगती

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

प्राधिकृत अधिकारी तथा जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या नेतृत्वाखाली दि नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या प्रशासनात पारदर्शकता, आर्थिक शिस्त आणि थकीत कर्जवसुलीला प्राधान्य देत बँकेच्या हिताचे अनेक महत्त्वपूर्ण निर्णय प्रभावीपणे राबविण्यात आले असून त्याचे सकारात्मक परिणाम बँकेच्या कामकाजावर दिसून येत आहेत.

दि नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाची मुदत 3 एप्रिल 2026 रोजी संपुष्टात आल्याने विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था लातूर यांनी 27 एप्रिल 2026 रोजी संचालक मंडळ निष्प्रभावित करून बँकेचा दैनंदिन कारभार पाहण्यासाठी नांदेडचे सहकारी संस्था जिल्हा उपनिबंधक शाहुराज हिरे यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती केली होती. त्यानंतर अपर निबंधक तथा सहसचिव सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग मुंबई यांच्या निर्देशानुसार विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था लातूर यांनी 20 मे 2026 रोजी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांची बँकेचे प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती केली. त्यांनी 22 मे 2026 रोजी पदभार स्वीकारल्यानंतर बँकेच्या कामकाजात गती आणत विविध महत्त्वपूर्ण निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी केली.

जून व जुलै 2026 या दोन महिन्यांत बँकेच्या मासिक बैठका नियमित घेण्यात आल्या. या बैठकींमध्ये एकूण 70 ठरावांना मंजुरी देऊन बँकेच्या कामकाजाला गती देण्यात आली.

जिल्हा परिषद संबंधित पगारदार सहकारी पतसंस्थांच्या थांबलेल्या थकीत कर्जवसुलीचा प्रश्न प्राधान्याने हाताळण्यात आला. ज्यामध्ये बँकेचे व पगारदार पतसंस्थेचे सभासदाकडून सुमारे 15 कोटी इतकी थकबाकी असलेल्या कर्जाच्या वसुलीसाठी संबंधितांना निर्देश देण्यात आले. तसेच जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नांदेड यांच्याशी पत्रव्यवहार व चर्चा करून कर्जवसुलीची प्रक्रिया नियमित सुरू केली.

**प्राधिकृत अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांच्या कार्यकाळातील उल्लेखनीय कामगिरी**

बँकेचे आर्थिक नुकसान करणाऱ्या प्रकरणांवर कठोर भूमिका घेत अपहार, अफरातफर व नियमबाह्य कर्जवाटपात दोषी आढळलेल्या तीन कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी सेवेतून बडतर्फ करण्यात आले. तसेच कासराळी शाखेतील अपहार प्रकरणात दोन कर्मचाऱ्यांना निलंबित करून त्यांच्याविरुद्ध बिलोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या कारवाईद्वारे बँकेच्या हिताला बाधा आणणाऱ्या कोणत्याही गैरप्रकारास माफी दिली जाणार नाही, असा स्पष्ट संदेश देण्यात आला.

कलंबर विभाग सहकारी साखर कारखान्याकडे असलेल्या बँकेच्या थकीत कर्जाच्या वसुलीसाठी कारखान्याच्या मालमत्तेवर बँकेचा बोजा नोंदविण्याची कार्यवाही करण्यात आली. मा. दिवाणी न्यायालयाच्या आदेशानुसार सातबारा उताऱ्यावर बँकेचा बोजा नोंदविण्यात आल्यामुळे अनुत्पादित 10 कोटी रुपये कर्जाच्या वसुलीचा मार्ग मोकळा झाला.

## कर्तव्यनिष्ठ माजी सैनिक स्व.विकास किसन पोखरकर यांना श्रद्धांजली !!

आंबेगाव : (स. गांवकरी)



आंबेगाव तालुक्यातील पिंपळगाव (खडकी) गावचे सुपुत्र, आंबेगाव तालुका माजी सैनिक संघाचे अध्यक्ष तसेच परिवार पतसंस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी स्व.विकास किसन पोखरकर यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने अकाली निधन झाल्याची बातमी संपूर्ण तालुक्यासाठी अत्यंत दुःखद आहे. त्यांच्या निधनाने माजी सैनिक चळवळ, सहकार क्षेत्र आणि सामाजिक कार्यात कधीही न भरून येणारी पोकळी निर्माण झाली आहे. भारतीय लष्करात अधिकारी म्हणून देशसेवा बजावत असताना त्यांनी शिस्त, प्रामाणिकपणा आणि राष्ट्रसेवेची मूल्ये जपली. सेवेतून निवृत्त झाल्यानंतरही त्यांनी विश्रांतीचा मार्ग न स्वीकारता समाजसेवेचा वसा घेतला. आंबेगाव तालुक्यातील माजी सैनिकांना एकत्र आणून त्यांनी एक सक्षम आणि भक्कम संघटना उभी केली. माजी सैनिकांच्या विविध समस्या शासनापर्यंत पोहोचवून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. त्यामुळे माजी सैनिकांमध्ये त्यांनी विश्वासार्ह नेतृत्व निर्माण केले. गाव आणि परिसराच्या सर्वांगीण विकासासाठीही त्यांचे योगदान उल्लेखनीय राहिले. सामाजिक एकोपा, विकासकामांमध्ये लोकसहभाग आणि गावाच्या प्रगतीसाठी ते नेहमीच पुढाकार घेत असत. त्यांच्या कार्याचा प्रभाव केवळ एका संस्थेपुरता मर्यादित नव्हता, तर संपूर्ण समाजाला दिशा देणारा होता.

# शेठ एन.के.टी. स्कूलमध्ये पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात!

ठाणे : (स. गांवकरी)




शेठ एन.के.टी. इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज ऑफ कॉमर्स, ठाणे (पश्चिम) येथील शेठ एन.के.टी. सभागृहात शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चा वार्षिक शैक्षणिक पारितोषिक वितरण समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. राष्ट्रगीत व राज्यगीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर दीपप्रज्वलन, श्लोक पठण आणि विद्यार्थ्यांच्या प्रार्थना नृत्याने उपस्थितांची मने जिंकली. मान्यवर, विश्वस्त, प्राचार्य, शिक्षक व समन्वयक यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास डेप्युटी कमिशनर ऑफ पोलीस (झोन-१, ठाणे) श्री. बाळासाहेब पाटील (आय.पी.एस.), ज्येष्ठ पत्रकार डॉ. विश्वासराव आरोटे, डॉ. संभाजीराव डांगे, श्री. नटवरलाल वीरजीभाई ठक्कर, श्री. अशोकभाई ठाणावाला, श्री. रामजीभाई पटेल, श्री. मयुर कापडिया, श्री. राजेंद्र पुराणी, शेठ टी. जे. हायस्कूल तसेच एन.के.टी. कॉलेजच्या प्राचार्या श्रीमती मनीषाबेन ठक्कर, शेठ एन.के.टी. इंग्लिश मीडियम स्कूलच्या प्राचार्या श्रीमती लिडिया सालियन, संस्थेचे विश्वस्त, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रमुख पाहुणे श्री. बाळासाहेब पाटील यांनी विद्यार्थ्यांनी अंमली पदार्थांपासून दूर राहून जबाबदार नागरिक बनावे, असा संदेश दिला. संस्थेचे अध्यक्ष श्री. नानजीभाई ठक्कर यांनी शिक्षणासोबत विवेक, नम्रता आणि सदाचाराचे महत्त्व अधोरेखित केले. डॉ. संभाजीराव डांगे यांनी विद्यार्थ्यांना नियमित खेळाचे महत्त्व पटवून दिले. ज्येष्ठ पत्रकार डॉ. विश्वासराव आरोटे यांनी शिक्षक हे विद्यार्थ्यांचे खरे मार्गदर्शक असल्याचे सांगत पालकांनी शिक्षकांना सहकार्य करण्याचे आवाहन केले. त्यांनी आपल्या जीवनातील अनुभव सांगून विद्यार्थ्यांना परिश्रम, शिस्त आणि आत्मविश्वासाच्या बळावर यश मिळविण्याचा प्रेरणादायी संदेश दिला. यावेळी त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक व पत्रकारितेतील योगदानाबद्दल त्यांचा शाल, पुष्पगुच्छ आणि चांदीची प्रभू श्रीरामांची मूर्ती देऊन विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका श्रीमती लिडिया सालियन होत्या. त्यांनी शाळेचा वार्षिक अहवाल सादर करत वर्षभरातील शैक्षणिक, क्रीडा, सांस्कृतिक व सहशालेय उपक्रमांचा आढावा मांडला. अनुदानित व विनाअनुदानित विभागांचे वार्षिक अहवालही सादर करण्यात आले. यावेळी गुजराती माध्यम शाळा, एन.के.टी. इंग्लिश मीडियम स्कूल तसेच अनुदानित व विनाअनुदानित कनिष्ठ महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिके व प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. दहावी व बारावीच्या बोर्ड परीक्षेत शंभर टक्के निकालासाठी उल्लेखनीय योगदान देणाऱ्या शिक्षकांचाही विशेष गौरव करण्यात आला. आभार प्रदर्शनानंतर राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा गौरव करणारा आणि त्यांना उज्ज्वल भविष्यासाठी प्रेरणा देणारा हा समारंभ संस्मरणीय ठरला.

# .... अन्यथा २ ऑक्टोबर पासून असहकार आंदोलन

## राज्यव्यापी व्यापारी परिषदेत व्यापाऱ्यांचा इशारा

मुंबई/उदय ठक्कर : (स. गांवकरी)

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड एग्रीकल्चरचे कमिटी मेंबर आणि ठाणे जिल्हा होलसेल व्यापारी वेल्फेअर महासंघाचे अध्यक्ष श्री सुरेश भाई ठक्कर यांनी सांगितले की संपूर्ण राज्यातील मार्केट सेस २ ऑक्टोबर पर्यंत हटविला नाही तर येत्या गांधी जयंती पासून सरकार विरोधात असहकार आंदोलन पुकारत सेसची वसूली केली जाणार नाही व तो भरलाही जाणार नाही असा इशारा कोल्हापूरात आज झालेल्या राज्यव्यापी परिषदेत देण्यात आला. आज कोल्हापूरात झालेली परिषद ही आंदोलनाची पहिली पायरी असून २ ऑक्टोबर पर्यंत नाशिक व मुंबई येथेही राज्यव्यापी मेळावे घेणार आहोत असे महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ॲग्रीकल्चर, मुंबईचे अध्यक्ष रवींद्र माणगावे यांनी सांगितले. तसेच महाराष्ट्र चेंबर तर्फे ९ ऑगस्ट क्रांती दिनी सोशल मीडियाव्दारे आंदोलनाची पुढील दिशा ठरविणार असून मार्केट सेस हटविणेसाठी महाराष्ट्र चेंबर अग्रभागी असे त्यांनी सांगितले. गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला हा प्रश्न सोडवण्यासाठी लढा उभारावा लागेल. सोशल मीडियाच्या माध्यमातून सेस विरोधात चळवळ सुरू करणे अधिक चांगले होईल. गरज पडल्यास मुंबईतील आझाद मैदानावर आंदोलन करावे लागेल. प्रसंगी उपोषण करू. पण हा लढा निकराणे लढू. ते पुढे म्हणाले, देशात ज्यावेळी जीएसटी लागू केला त्यावेळी अन्नधान्य, खाद्यान्न हे जीएसटी मधून वगळले जातील असे केंद्र शासनाने जाहिर केले होते. व ते वगळले देखील गेले होते. परंतू, जुलै २०२२ पासून वेगवेगळे नियम करुन अन्नधान्य, खाद्यान्न व गूळ यावर जीएसटी लागू करुन व्यापाऱ्यांची घोर फसवणूक केली आहे. तसेच मार्केट सेस व व्यवसाय कराचा भुर्दंड आजही व्यापाऱ्यांना सहन करावा लागतो. जीएसटी असताना मार्केट सेस रद्द होणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

कोल्हापूर चेंबरचे अध्यक्ष संजय शेटे यांनी प्रास्ताविकात मार्केट सेसमुळे व्यापाऱ्यांवर पडणारा वाढता आर्थिक भार आणि त्याचा व्यापारावर होणारा परिणाम स्पष्ट केला. तसेच कोल्हापूर चेंबरने सेस रद्द व्हावा यासाठी केलेल्या प्रयत्नाची माहिती दिली. कोल्हापूर चेंबर जिल्ह्यातील व्यापारी आणि उद्योजकांचे प्रश्न, समस्या आणि अडचणी सरकार दरबारी तसेच राज्यस्तरीय संघटना यांच्यापर्यंत पोहोचवण्याचे काम सातत्याने करत आहे. सेसच्या मुद्द्यावरही चर्चा केली आहे. आपण सर्वानी एकजूट होऊन आपली ताकद दाखवल्यास सरकारला सेस रद्द करावाच लागेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला..

कॅमिटचे चेअरमन मोहन गुरनानी यांनी, वास्तविक मार्केट सेस हटणे हीच आमची मागणी असताना शासनाने नियमन मुक्त केलेला माल मार्केट समितीला आपल्या उपविधीमध्ये नियमन करुन सेवा शुल्क (यूजर चार्जेस) (उदा. रवा, मैदा, तेल, डाळी, ड्रायफ्रुट) यावर आकारण्याचा अधिकार मार्केट समितीला देऊन मार्केट सेस सह जीएसटीची आकारणी करुन व्यापाऱ्यांना व ग्राहकांना वेठीस धरले आहे. तसेच वेगवेगळ्या मार्केट समिती आवारात नाके बसविले व मालाची तपासणी सुरु केली. त्यामुळे मार्केट आवारासह मार्केट आवाराबाहेरील सेस रद्द करुनच दाखवणार असे सांगितले.

कॅमिटचे प्रेसिडेंट दिपेन आगरवाल सेसमुळे व्यापाऱ्यांना होणार त्रास आणि बसणारी आर्थिक झळ याविषयी मुख्यमंत्र्याना कल्पना दिली आहे. यावर सकारात्मक निर्णय घेण्याची ग्वाही त्यांनी दिली आहे. यामुळे व्यापाऱ्यांनी तातडीने टोकाची भूमिका न घेता सरकारला दोन महिन्यांची मुदत देऊया. २ ऑक्टोबरपर्यंत यावर निर्णय न झाल्यास आपण तीव्र आंदोलन करू. दरम्यानच्या काळात व्यापारी संस्था, संघटनांनी आपापल्या कार्यक्षेत्रातील आमदार, खासदार यांना सेस बाबतचे निवेदन द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. ज्याप्रकारे एलबीटी विरुध्दचा लढा कोल्हापूरातून यशस्वी झाला तसाच मार्केट सेस विरोधातील लढा कोल्हापूरातूनच यशस्वी होईल असा विश्वास असल्याने कोल्हापूरात आज परिषदेत आयोजित केल्याचे त्यांनी सांगितले.

दि ग्रेन, राईस अँड ऑईल सीडस् मर्चंटस् असोसिएशन, मुंबईचे अध्यक्ष भिमजी भानुशाली यांनी मार्केट सेस हटविणेसाठी आंदोलनाशिवाय पर्याय नसल्याने शासनाचे लक्ष वेधण्यासाठी महाराष्ट्र राज्य व्यापारी कृती समितीने ५ डिसेंबर २०२५ रोजी एक दिवसीय महाराष्ट्र व्यापार बंदचे आवाहन केले होते व त्यास राज्यातील सर्व व्यापारी संघटनांनी प्रतिसाद देत कडकडीत बंद पाळला होता. बंदची दखल घेत ८ डिसेंबर २०२५ रोजी नागपूर येथे पणनमंत्री जयकुमार रावल आणि पणन संचालक संजय कदम यांच्यासोबत बैठक झाली. त्या बैठकीत मार्केट सेस रद्द होणेबाबत चर्चा झाली व त्याबाबतचे इतिवृत्त देखील करण्यात आले. पण गेल्या ८ महिन्यांत मार्केट सेस रद्द होणेबाबत ठोस निर्णय झालेला नाही. त्यामुळे आता आंदोलनाची हाक पुकारावी लागेल असे सांगितले.

दि पुना मर्चंटस् चेंबरचे अध्यक्ष राजेंद्र बाठीया यांनी शासनाने मार्केट समित्यांना यूजर चार्जेस आकारण्याबाबत दिलेल्या अधिकारावर चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र राज्य व्यापारी कृती समिती तर्फे ३० मे २०२६ रोजी पुणे येथे बैठक झाली. त्या बैठकीत मुळात आमची मागणी मार्केट सेस हटाव ही असताना महाराष्ट्र शासनाने मार्केट समितीला कृषी उत्पादनांच्या किंवा गैर कृषी उत्पादनांच्या विपणनासाठी मार्केट समिती स्वत: ठरवेल अशा दराने व्यापाऱ्यांना सेवा शुल्क (यूजर चार्जेस) आकारण्याचा किंवा वसूल करण्याचा अधिकार दिला असून यूजर चार्जेस आकारण्यात येणाऱ्या काही वस्तूंवर अगोदरच जीएसटी लागू होता त्यावर पुन्हा यूजर चार्जेस लागू करणे म्हणजे मार्केट सेस, यूजर चार्जेस व जीएसटी अशा तिहेरी करांचा बोजा व्यापाऱ्यांवर लागू होणार होता. कृती समितीच्या बैठकीत विरोध झाल्यानंतर यूजर चार्जेस ला स्थगिती देण्यात आली. परंतु, त्यानंतर देखील मुंबईतील व्यापाऱ्यांना यूजर चार्जेसच्या मोठ्या रकमेच्या नोटीसा धाडल्या आहेत. त्या नोटीसा देखील मागील तारखेच्या काढल्या आहेत. व्यापाऱ्यांनी मागील कर आणि वसूली केलीच नाही तर तो भरायचाच कसा?

कॅमिटचे मानद सचिव अजित कोठारी यांनी मार्केट सेस बाबत पुढील दिशा ठरविणेसाठी कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज व दि कोल्हापूर ग्रेन मर्चंटस् असोसिएशन मार्फत निर्णायक परिषद घेण्याच्या उद्देशाने राज्यस्तरीय संघटनेंसोबत मागील महिन्यात दर गुरुवारी ऑनलाईन बैठक झाली. तसेच कोल्हापूरात २२ जुलै रोजी जिल्हास्तरीय मेळावा घेऊन जिल्ह्यातून आलेल्या व्यापाऱ्यांनी मार्केट सेस विरोधात आपला रोष व्यक्त केला. कोल्हापूरात झालेला मेळावा पाहता राज्यातील इतर जिल्ह्यातही जिल्हास्तरीय मेळावे झाले. मार्केट सेस विरोधात व्यापाऱ्यांची एकजुट दाखविण्यासाठी आज कोल्हापूरात राज्यव्यापी व्यापारी परिषद पार पडली असून विना पर्याय सेस हटाव हीच आमची ठाम मागणी असून जोपर्यंत सेस हटत नाही तोपर्यंत राज्यभर लढा चालूच ठेवण्याचे ठरविण्यात आले.

नाशिक धान्य किराणा घाऊक व्यापारी संघटनेचे अध्यक्ष प्रफुल्ल संचेती यांनी, मार्केट सेस विरोधात आता आरपारची लढाई लढावी लागणार असून कोल्हापूर नंतर पुढील टप्प्यात नाशिक मध्ये राज्यव्यापी परिषद घेत असल्याचे सांगितले. यावेळी राजू राठी (सोलापूर), नीलेश सेठी (छत्रपती संभाजीनगर), राजेंद्र बोथरा (अहिल्यानगर), सतीश पंच (जळगांव), सुरेश चिककली (सोलापूर), संभाजी किरवे (बारामती), पांडुरंग मुंदडा (लातूर), सुरेश ठक्कर (ठाणे), अमरसिंह देसाई (सांगली), रमेश उमाठे (नागपूर) सुरेश इंग्रोळे (हुपरी) यांनी देखील मनोगते व्यक्त केली.

दि कोल्हापूर ग्रेन मर्चंटस् असोसिएशनचे अध्यक्ष संजीव परीख यांनी स्वागत करताना परिषद कोल्हापूरात घेण्याचा उद्देश सांगताना एलबीटी विरुध्दातील लढा ज्याप्रकारे कोल्हापूरने यशस्वी केला त्याप्रमाणे मार्केट सेस विरोधातील देखील यशस्वी होईल असे सांगितले.

दरम्यान, सर्व वक्त्यांनी व्यापाऱ्यांवरील अन्यायकारक आर्थिक भार दूर करण्यासाठी राज्य शासनाने तातडीने निर्णय घेण्याची मागणी केली. यावेळी सांगण्यात आले की, देशात जीएसटी लागू झाल्यानंतर अनेक कर रद्द करण्यात आले होते. मात्र, त्यानंतर राज्य शासनाने बाजार समित्यांना सेवा शुल्क (युजर चार्जेस) आकारण्याचा अधिकार दिल्यामुळे व्यापाऱ्यांवर मार्केट सेस, युजर चार्जेस आणि जीएसटी असा तिहेरी आर्थिक बोजा पडत आहे. यामुळे व्यापार करणे अधिक खर्चिक होत असून व्यापारी आणि ग्राहक दोघांनाही त्याचा फटका बसत असल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

यापूर्वी राज्यभर व्यापाऱ्यांनी मार्केट सेसविरोधात आंदोलन, व्यापारी मेळावे आणि महाराष्ट्र बंद यांसारखी आंदोलने केली होती. शासनाशी अनेक बैठका झाल्या, सकारात्मक आश्वासनेही मिळाली; मात्र प्रत्यक्षात कोणताही ठोस निर्णय झालेला नसल्याने व्यापाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी असल्याचे यावेळी सांगण्यात आले. शासनाने पूर्वी काढलेल्या काही परिपत्रकांना स्थगिती दिली असली तरी अंतिम निर्णय न झाल्याने प्रश्न अद्याप कायम असल्याचे वक्त्यांनी स्पष्ट केले.

मार्केट सेस संघर्ष निर्मूलन संघर्ष समितीचे समन्वयक म्हणून कोल्हापूर चेंबरचे मानद सचिव अजित कोठारी यांची निवड करण्यात आली. दरम्यान, अखिल ग्राहक पंचायतने देखील मार्केट सेस विरोधातील परिषदेस पाठींबा दिला.

यावेळी कॅमिट व कोल्हापूर चेंबरचे सचिव अजित कोठारी, कोल्हापूर चेंबरचे माजी अध्यक्ष आनंद माने, प्रदीपभाई कापडिया, विजय कागले, धन्यकुमार चव्हाण, किरण तपकीरे, श्रीनिवास मिठारी, सुरेश लिंबेकर, अभयकुमार अथणे, अमर क्षीरसागर, संतोष लाड, कुमार अहुजा, राहुल नष्टे, विवेक नष्टे, अनिल धडाम, अविनाश नासिपुडे, अतुल शहा यांच्यासह राज्यातील व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विवेक शेटे यांनी सूत्रसंचालन केले. वैभव सावर्डेकर यांनी आभार मानले.





### परिषदेत खालील ठराव पारित करण्यात आलेले आहेत

1. महाराष्ट्र राज्य व्यापारी कृती समितीचे हात बळकट करणेसाठी प्रत्येक जिल्ह्यातील व्यापारी प्रतिनिधींची मार्केट सेस निर्मूलन संघर्ष समितीची स्थापना करणे.
2. २ ऑक्टोबर २०२६ पासून सेस वसूल करणार नाही आणि भरणार देखील नाही. कारवाईचा प्रयत्न केल्यास महाराष्ट्र बंद पुकारला जाईल.3. अन्नधान्य व खाद्यान्न वस्तूंवर ५% जीएसटी लागू झालेला आहे व त्याचे राजस्व राज्य शासनाला मिळत आहे. त्यामुळे कृषी उत्पन्न बाजार समिती सेस (कर) विना पर्याय रद्द व्हावा.
3. एलबीटी प्रमाणे मार्केट समितीला अनुदान द्यावे.
4. दि. २६/०८/२०२४ रोजी मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्या समवेत झालेल्या चर्चेमध्ये अनिर्णित विषयांवर पुन्हा त्वरीत बैठक घेऊन निर्णय घेण्यात यावेत.
5. राष्ट्रीय बाजार समिती बाबत शासनाने प्रस्तावीत केलेल्या अध्यादेशामधील त्रुटी दूर करण्याबाबत व्यापारी संघटनांसोबत त्वरीत चर्चा करण्यात यावी.
6. कृषी उत्पन्न बाजार समिती कायद्यांमधील बदलांबाबत यापूर्वी सुचविण्यात आलेल्या बदलांबाबत व्यापारी संघटनां बरोबर चर्चा करुन निर्णय घ्यावेत.
7. यापूर्वी दिलेल्या आश्वासनानुसार कृषी उत्पन्न बाजार समितीचे परवाने ऑनलाईन उपलब्ध करुन द्यावेत. अन्यथा महाराष्ट्रातील व्यापारी परवाने नूतनीकरण करणार नाहीत.
8. शासनाने मार्केट समित्यांना सेवा शुल्क (यूजर चार्जेस) आकारण्याचा किंवा वसूल करण्याचा दिलेला अधिकार मागे घ्यावा.

## थोडक्यात पण महत्वाचे



### कडाचीवाडी ग्रामपंचायत विशेष पुरस्काराने सन्मानित

राजगुरुनगर (स. गांवकरी) : संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान २०२५-२०२६ अंतर्गत खेड तालुक्यातील कडाचीवाडी ग्रामपंचायतीला विशेष पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. कडाची वाडी,ग्रामपंचायतीच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल डॉ. बाबासाहेब आंबेडकर पाणीपुरवठा व पाणी व्यवस्थापन विशेष पुरस्कार म्हणून ७५ हजार रुपये, तसेच पुणे जिल्ह्यात द्वितीय क्रमांक मिळवल्याबद्दल ४ लाख रुपयांचे पारितोषिक दिनांक १ रोजी प्रदान करण्यात आले.असून खेडचे आमदार बाबाजी रामचंद्र काळे यांच्या हस्ते ग्रामपंचायतीचा गौरव करण्यात आला. यावेळी बोलताना आमदार काळे म्हणाले की, या यशामुळे ग्रामीण भागातील स्वच्छता, पाणी व्यवस्थापन आणि लोकसहभागावर आधारित उपक्रमांना नवी प्रेरणा मिळेल. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल ग्रामपंचायतीचे प्रशासक सुखदेव साळुंखे, विस्तार अधिकारी किसन मोरे, ग्रामपंचायत अधिकारी निलेश पांडे, पदाधिकारी, ग्रामस्थ, स्वच्छता कर्मचारी तसेच अभियानाच्या यशात योगदान देणाऱ्या सर्वांचे अभिनंदन करण्यात आले. यावेळी उपविभागीय अधिकारी अनिल दौंडे, तहसीलदार प्रशांत बेडसे, गटविकास अधिकारी विशाल शिंदे, पंचायत समितीच्या सभापती विद्याताई मोहिते, उपसभापती मंगेश सावंत, जिल्हा परिषद सदस्य गणेश अरगडे तसेच पंचायत समिती सदस्य महेंद्र मेदनकर उपस्थित होते.

### छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

राजगुरुनगर (स. गांवकरी) : राजगुरुनगर येथे छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिरात' एक हजार ९७१ लाभार्थ्यांना लाभांचे वितरण करण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंती निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरात महसूल, जात व उत्पन्न प्रमाणपत्र, सातबारा, फेरफार, वारस नोंद, निवास दाखले, रेशन कार्ड, कृषी, वन, शिक्षण, महिला व बालविकास, ग्रामविकास तसेच विविध राज्य व केंद्र शासनाच्या योजनांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. अनेक अर्जांवर तातडीने कार्यवाही करण्यात आली, तर उर्वरित अर्ज संबंधित विभागांकडे प्राधान्याने निकाली काढण्यासाठी पाठविण्यात आले. शिबिरात राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ नागरिकांना देण्यात आला. महिला बचत गट व इतर योजनांचे लाभ : ५७ इतर लाभ, राजपत्र आदेश, रक्तदान, बीएलओ सन्मान आदी : ६३ असे सर्व १९७१ लाभार्थ्यांना विविध योजनाचा या शिबिरात लाभ देण्यात आला.

## सुविधा शून्य, तरी बाजार कर थेट ५० रुपये; राजूर ग्रामस्थांमध्ये संताप

आठवडे बाजारातील कर वसुलीत मनमानी वाढ केल्याचा आरोप; मूलभूत सुविधांचा अभाव, ग्रामसभेत प्रशासनाला विचारला जाब

राजूर : (स. गांवकरी)

राजूर येथील आठवडे बाजारात व्यापारी आणि शेतकऱ्यांना आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध नसतानाही बाजार कर वसुलीच्या दरात मोठी वाढ करण्यात आल्याने ग्रामस्थ आणि विक्रेत्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. पूर्वी १० ते २० रुपये असलेली पावती थेट ५० रुपयांपर्यंत वाढवण्यात आल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला असून, ही दरवाढ तातडीने मागे घेण्याची मागणी होत आहे.

राजूरच्या आठवडे बाजारात पिण्याच्या पाण्याची पुरेशी व्यवस्था नाही, स्वच्छतागृह नाही, नियमित स्वच्छतेचाही अभाव असल्याचे व्यापारी आणि ग्रामस्थांचे म्हणणे आहे. बाजारासाठी स्वतंत्र व नियोजित जागा उपलब्ध नसल्याने रस्त्यावरच दुकाने थाटावी लागत आहेत. विशेषतः कॉलेज रोड परिसरात सोमवारी बाजार भरत असल्याने विद्यार्थी, स्थानिक नागरिक आणि वाहनचालकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो.

बाजारानंतर परिसरात मोठ्या प्रमाणात कचरा आणि अस्वच्छता निर्माण होत असल्याचीही नागरिकांची तक्रार आहे. अशा परिस्थितीत सुविधा वाढवण्याऐवजी कर वसुली वाढवण्यावर भर का दिला जात आहे, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

बाजारातील समस्यांबाबत विचारणा केली असता, प्रभारी सरपंचांनी आपणास पदभार स्वीकारून अवघा एक महिना झाला असून एवढ्या कमी कालावधीत बदल कसा होणार, अशा आशयाचे उत्तर दिल्याचा दावा ग्रामस्थांनी केला आहे.

मात्र कर वाढवण्याचा निर्णय तत्परतेने घेतला जात असेल, तर व्यापारी व शेतकऱ्यांना सुविधा देण्यासाठीही तितकीच तत्परता दाखवावी, अशी ग्रामस्थांची मागणी आहे. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, पाच फूट जागेसंदर्भात कर आकारणी अथवा सवलतीचा मुद्दा बैठकीत मांडण्यात आला.

मात्र प्रत्यक्षात एवढ्या कमी जागेत व्यावसायिक दुकान थाटणे शक्य नसल्याचे व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे.

बाजारात डोक्यावर भाजीचे टोपले घेऊन येणाऱ्या छोट्या शेतकरी आणि विक्रेत्यांकडूनही कर आकारला जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

अल्प प्रमाणात माल घेऊन बाजारात येणाऱ्या शेतकऱ्यांचा प्रवास खर्च आणि विक्रीचा विचार करता त्यांच्यावर वाढीव कराचा अतिरिक्त आर्थिक भार पडत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

### ग्रामसभेत वाढीव वसुलीवरून सवाल

नुकत्याच झालेल्या ग्रामसभेत 'साईकृपा भेळ सेंटर'चे मालक विजुभाऊ हेकरे यांनी वाढीव बाजार कर वसुलीबाबत प्रशासनाला जाब विचारला. यावेळी कर आकारणीचे निकष आणि व्यापाऱ्यांना दिल्या जाणाऱ्या सुविधांबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आले.

बाजारासाठी स्वतंत्र जागा नाही, बैठक व्यवस्था नाही, पिण्याचे पाणी व स्वच्छतागृहासारख्या मूलभूत सुविधा नाहीत आणि स्वच्छतेचाही प्रश्न कायम आहे. अशा परिस्थितीत थेट ५० रुपयांची वसुली करणे अन्यायकारक असल्याची भावना ग्रामस्थ आणि व्यापाऱ्यांनी व्यक्त केली आहे.

## दिवा पोलीस स्टेशनचे काम ९५% पूर्ण तरीही उदघाट्नाची प्रतिक्षा

ठाणे : (स. गांवकरी)

दिवा शहराची झपाट्याने वाढणारी लोकसंख्या आणि त्याचबरोबर वाढणाऱ्या गुन्हेगारीच्या घटना लक्षात घेता दिवा येथे स्वतंत्र पोलीस स्टेशन सुरू करण्याची मागणी अनेक वर्षांपासून होत आहे. विशेष म्हणजे पोलीस स्टेशनसाठीची इमारत तयार असून, ठाणे महापालिकेकडून नुकतेच या इमारतीला OC (भोगवटा प्रमाणपत्र) मिळाले असल्याची माहिती आहे. मात्र, अद्याप पोलीस स्टेशन प्रत्यक्षात सुरू झालेले नसल्याने दिवेकरांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. सध्या दिव्यातील नागरिकांना तक्रार किंवा गुन्ह्याची नोंद करण्यासाठी मुंब्रा पोलीस स्टेशनमध्ये जावे लागते. दिवा ते मुंब्रा हा प्रवास विशेषतः रात्रीच्या वेळी नागरिकांसाठी मोठी अडचण ठरत आहे. एखादी घटना रात्री उशिरा घडल्यास परिस्थिती आणखी गंभीर होते. रात्री १२ ते १ नंतर लोकल सेवा बंद होत असल्याने नागरिकांना तक्रार करण्यासाठी किंवा पोलिसांची मदत घेण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे स्वतंत्र दिवा पोलीस स्टेशन तातडीने सुरू करण्याची गरज निर्माण झाली आहे. दिवा परिसरात घरफोडी, चोरीसह विविध गुन्ह्यांच्या घटना समोर येत आहेत. वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत उपलब्ध पोलीस बळ अपुरे असल्याने पोलिसांवर मोठा ताण येत असल्याचे चित्र आहे.




## डॉ. अतुलसिंग परदेशी यांची प्रदेशाध्यक्षपदी सलग दुसऱ्यांदा बिनविरोध निवड

पुणे : (स. गांवकरी)

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईच्या इलेक्ट्रॉनिक मीडिया प्रदेशाध्यक्षपदी डॉ.अतुलसिंग परदेशी यांची सलग दुसऱ्यांदा बिनविरोध निवड झाल्याने राज्यभरातील पत्रकार, सामाजिक, राजकीय व विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. या निवडीमुळे "आपला आवाज न्यूज नेटवर्क" च्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

डॉ.अतुलसिंग परदेशी यांनी गेल्या २२ वर्षांपासून पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिले आहे. सन २००४ ते २०१४ या कालावधीत त्यांनी प्रिंट मीडियामध्ये कार्य करत दैनिक लोकमत, दैनिक पुढारी, दैनिक पुण्यनगरी, दैनिक प्रभात अशा नामांकित दैनिकांमधून शिवजन्मभूमी जुन्नर किल्ले शिवनेरी येथून पत्रकारिता केली. त्यानंतर २०१४ पासून आपल्या मालकीच्या आपला आवाज न्यूज नेटवर्कच्या माध्यमातून इलेक्ट्रॉनिक मीडियामध्ये प्रवेश करून आधुनिक पत्रकारितेच्या माध्यमातून समाजातील सर्वसामान्यांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने काम केले आहे. निर्भीड, रोखठोक आणि सकारात्मक पत्रकारिता ही त्यांची ओळख बनली आहे. विविध सामाजिक, शासकीय व लोकहिताच्या प्रश्नांवर प्रभावीपणे आवाज उठवत अनेक नागरिकांना न्याय मिळवून देण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. पत्रकारिता ही केवळ बातमी देण्यापुरती मर्यादित न ठेवता समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम बनविण्याचा त्यांनी सातत्याने प्रयत्न केला आहे. गेल्या *बारा वर्षांपासून "आपला आवाज न्यूज नेटवर्क"*च्या माध्यमातून त्यांनी पुणे जिल्ह्यासह राज्यभरात ग्रामीण आणि शहरी भागात पत्रकारितेचे सक्षम जाळे उभारले आहे. सामाजिक बांधिलकी जपत तरुण पत्रकारांना संधी देणे, ज्येष्ठ पत्रकारांचा सन्मान राखणे तसेच पत्रकारांच्या अडचणी, हक्क आणि प्रश्नांसाठी सातत्याने लढा देण्याचे कार्य त्यांनी केले आहे. त्यामुळे पत्रकार बांधवांमध्ये त्यांच्याविषयी विशेष विश्वास आणि आत्मीयता निर्माण झाली आहे.

डॉ. परदेशी यांच्या या निवडीबद्दल राज्याचे माजी गृहमंत्री नामदार दिलीपराव वळसे पाटील यांनी दूरध्वनीद्वारे शुभेच्छा दिल्या. तसेच विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, मावळ लोकसभेचे खासदार श्रीरंग आप्पा बारणे, चिंचवडचे आमदार शंकर शेठ जगताप, भोसरीचे आमदार महेश दादा लांडगे तसेच महापौर रवी लांडगे यांच्यासह विविध राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आणि पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष निलेश सोमानी, राज्य संघटक संजय भोकरे आणि प्रदेश सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे यांनी डॉ. अतुलसिंग परदेशी यांच्यावर सलग दुसऱ्यांदा इलेक्ट्रॉनिक मीडिया प्रदेशाध्यक्ष पदाची जबाबदारी सोपवत त्यांच्या कार्यावर विश्वास व्यक्त केला आहे.

राज्यभरातील पत्रकार संघटना, संपादक, पत्रकार आणि विविध सामाजिक संस्थांनीही डॉ. परदेशी यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

यावेळी प्रतिक्रिया व्यक्त करताना डॉ. अतुलसिंग परदेशी म्हणाले, "ही जबाबदारी माझ्यासाठी सन्मानासोबतच अधिक मोठी जबाबदारी आहे. राज्यभरातील पत्रकार बांधवांचे प्रश्न, त्यांचे न्याय्य हक्क, सुरक्षितता, सन्मान आणि संघटनात्मक बळकटी यासाठी पूर्वीप्रमाणेच अधिक जोमाने कार्य करणार आहे.



पत्रकारितेची विश्वासार्हता, सामाजिक बांधिलकी आणि लोकहित जपत महाराष्ट्रातील प्रत्येक पत्रकाराच्या पाठीशी ठामपणे उभा राहण्याचा माझा प्रयत्न कायम राहील." डॉ. अतुलसिंग परदेशी यांच्या सलग दुसऱ्यांदा झालेल्या बिनविरोध निवडीमुळे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या इलेक्ट्रॉनिक मीडिया विभागाला अधिक बळ मिळणार असून पत्रकारांच्या हक्कांसाठी संघटनेचे कार्य अधिक प्रभावीपणे पुढे जाईल, असा विश्वास पत्रकार बांधवांनी व्यक्त केला आहे.

## थोडक्यात बातम्या...



### आंबोलीत युवकावर बिबट्याचा जीवघेणा हल्ला

शिवनेरी (स. गांवकरी) : आंबोली : आंबोली येथे बुधवारी सकाळी साडेआठच्या सुमारास प्रशांत धमा भालचिम (वय ३५) या युवकावर बिबट्याने अचानक हल्ला केल्याची घटना घडली. या हल्ल्यात भालचिम यांच्या हाताला दुखापत झाली असून, त्यांच्यावर जुन्नर येथील सरकारी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, हल्लेखोर बिबट्याला तातडीने पकडण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे. प्रशांत भालचिम हे धरणाच्या पलीकडे डोंगरालगत वास्तव्यास आहेत. बुधवारी सकाळी साखर आणण्यासाठी घराबाहेर पडले असता घराजवळच दबा धरून बसलेल्या बिबट्याने त्यांच्यावर अचानक हल्ला केला. बिबट्याने त्यांच्या हातावर हल्ला केल्याने ते जखमी झाले. हल्ल्याच्या वेळी भालचिम यांनी प्रसंगावधान राखत मोठ्याने आरडाओरडा केला. त्यामुळे बिबट्या जवळच्या झाडाझुडपात पळून गेला. या प्रसंगाबाबत सांगताना भालचिम म्हणाले की, “हल्ल्यावेळी मी खाली पडलो असतो तर बिबट्याने मानेवर हल्ला केला असता. मात्र, मोठ्याने आरडाओरडा केल्याने तो पळून गेला.” बिबट्या साधारण कंबरेएवढ्या उंचीचा असल्याचे त्यांनी सांगितले. घटनेची माहिती जुन्नर वनविभागाला तातडीने देण्यात आली. त्यानंतर संबंधित वन अधिकाऱ्यांनी घटनास्थळी येऊन पाहणी केली. गावात सुमारे पाच महिन्यांपूर्वीपासून बिबट्याला पकडण्यासाठी पिंजरा लावण्यात आला आहे. मात्र, अद्याप बिबट्या पिंजऱ्यात अडकलेला नाही. आता थेट युवकावर हल्ला झाल्याने ग्रामस्थांमध्ये संताप आणि भीती वाढली असून, वनविभागाने तातडीने उपाययोजना करून बिबट्याला जेरबंद करावे, अशी जोरदार मागणी होत आहे. जखमी प्रशांत भालचिम यांच्यावर जुन्नर येथील सरकारी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. डॉ. राहुल सर्दे यांनी त्यांच्यावर तातडीने आवश्यक उपचार सुरू करण्यात आले असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे सांगितले.

### ३४० किलो गोमांस जप्त; ३ आरोपी ताब्यात व ४ आरोपी फरारी

शिवनेरी (स. गांवकरी) : जुन्नर शहर येथील खलीलपुरा या ठिकाणी ३४० किलो गोवंश कत्तल केल्यामुळे तीन आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहेत . याबाबत सविस्तर माहिती अशी आहे की , जुन्नर पोलीस स्टेशन यांना खलीलपुरा येथे एका खोलीमध्ये गोवंश कत्तल केल्याबाबत गोपनीय माहिती मिळाली . सदर बाबत पडताळणी करण्यासाठी धनंजय पाटील उपविभागीय पोलीस अधिकारी जुन्नर यांचे आदेशाने दत्तात्रय गुंड पोलीस निरीक्षक,पोलीस उपनिरीक्षक टिटमे व पथक स्थापन करून तपासणी केली. यावेळी एका खोलीमध्ये सुमारे ३४० किलो गोमांस मिळाले आहे. सदर गुन्ह्यामध्ये मोहसीन अब्बास कुरेशी , जब्बार अब्बास कुरेशी व शहानवाज कासीम कुरेशी या आरोपींना ताब्यात घेण्यात आलेले आहे.

# मुख्यमंत्र्यांसोबत भारतीय मजदूर संघाची महत्त्वपूर्ण बैठक

## विविध कामगार प्रश्नांवर सकारात्मक चर्चा



मुंबई : (स. गांवकरी)

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या समवेत भारतीय मजदूर संघाच्या (BMS) प्रतिनिधी मंडळाची विविध कामगार विषयांवर बुधवारी 'वर्षा' शासकीय निवासस्थान, मलबार हिल येथे महत्त्वपूर्ण बैठक झाली. दुपारी २.३० वाजता झालेल्या या बैठकीत १६ एप्रिल रोजी काढण्यात आलेल्या भारतीय मजदूर संघाच्या मोर्चाच्या निवेदनावर सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीत नवीन कामगार कायदे (लेबर कोड) संदर्भात भारतीय मजदूर संघाने आपली भूमिका स्पष्ट करत कामगारविरोधी तरतुदी रद्द करण्याची मागणी केली. तसेच कायद्याच्या कक्षेबाहेर जाणाऱ्या कामगारांसाठी स्वतंत्र कायदा करण्याची आग्रही मागणी संघाने केली. यावेळी राज्यात ESI योजना प्रभावीपणे राबविणे, बोनस मर्यादा ४२ हजार रुपये करणे, कंत्राटी कामगारांसाठी हरियाणा पॅटर्न लागू करणे, कामगार कपात नुकसानभरपाई ६० दिवस करणे, EPS पेन्शनधारकांना २ हजार रुपये पेन्शन देणे, विश्वकर्मा जयंतीला शासकीय सणाचा दर्जा देणे, विडी कामगारांना किमान वेतन देणे आदी प्रमुख मागण्या मांडण्यात आल्या.

माथाडी व सुरक्षा रक्षक मंडळातील न्यायालयीन प्रकरणे कामगार न्यायालयात चालविण्याबाबत बदल करण्याची मागणीही करण्यात आली. याशिवाय घरेलू कामगार, बांधकाम कामगार, आशा सेविका, अंगणवाडी सेविका, फेरीवाले, वीज कामगार महासंघ, वीज कंत्राटी कामगार, एसटी महामंडळ, सुरक्षा रक्षक, मेट्रो कामगार आदी विविध क्षेत्रांतील प्रश्नांवर स्वतंत्र बैठका घेण्याची मागणी संघाने केली.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी चर्चेला सकारात्मक प्रतिसाद देत बोनस मर्यादा ४२ हजार रुपये करण्याबाबत गांभीर्याने विचार केला जाईल, ESI संदर्भात स्वतंत्र बैठक घेतली जाईल, विश्वकर्मा जयंतीसह इतर मुद्द्यांवर सकारात्मक निर्णय घेतला जाईल, तसेच वीज उद्योगातील प्रश्नांवरही स्वतंत्र बैठक आयोजित केली जाईल, असे आश्वासन दिले. शासन स्तरावर अंतर्गत बैठक घेऊन भारतीय मजदूर संघाच्या प्रतिनिधींशी लवकरच पुन्हा चर्चा करण्याचेही त्यांनी सांगितले.

बैठकीस भारतीय मजदूर संघाचे अखिल भारतीय सचिव ॲड. अनिल ढुमणे, प्रदेश महामंत्री किरण मिलगिर, विदर्भ महामंत्री गजानन गटलेवार, सह क्षेत्र संघटन मंत्री मोहन येणुरे उपस्थित होते. शासनाच्या वतीने मुख्यमंत्र्यांचे सचिव श्रीकर परदेशी, महेश पोहणेरकर यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



## वर्षभरापासून फरार असलेल्या वॉन्टेड आरोपीला नाशिकमधून अटक

डांग, गुजरात : (स. गांवकरी)

डांग जिल्ह्यातील सापुतारा पोलिसांना मोठे यश मिळाले आहे. गेल्या एक वर्षापासून फरार असलेल्या वॉन्टेड आरोपीला महाराष्ट्रातील नाशिक येथून अटक करण्यात आली आहे. ही कारवाई डांग स्थानिक गुन्हे शाखा (LCB) आणि सापुतारा पोलिसांनी संयुक्तपणे केली. अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव शुभम दिवानजी पटेल (वय 25) असून तो नाशिक (महाराष्ट्र) येथील रहिवासी आहे. सापुतारा पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या मद्यबंदी (प्रोहिबिशन) कायद्यांतर्गत गुन्ह्यात तो गेल्या एक वर्षापासून फरार होता. तांत्रिक सर्व्हेलन्स, मोबाईल लोकेशन ट्रॅकिंग आणि मानवी गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी आरोपीचा नाशिकमधील ठावठिकाणा निश्चित केला. त्यानंतर सापळा रचून त्याला ताब्यात घेण्यात आले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वर्ष 2025 मध्ये ट्रकची नंबर प्लेट बदलून गुजरातमध्ये अवैध दारूची तस्करी केल्याप्रकरणी आरोपी वॉन्टेड होता. त्या वेळी पोलिसांनी ट्रकमधून 1,788 दारूच्या बाटल्या आणि सुमारे 9.68 लाख रुपयांपेक्षा अधिक किमतीचा मुद्देमाल जप्त केला होता. शोधमोहीमेनंतर डांग एलसीबी आणि सापुतारा पोलिसांनी संयुक्त कारवाई करून आरोपीला अखेर अटक केली आहे. या प्रकरणातील इतर आरोपी, तसेच अवैध दारू तस्करीच्या संपूर्ण रॅकेटचा तपास आता अधिक वेगाने सुरू करण्यात आला आहे.

### अल्पावधीतच वाचकांच्या पसंतीस उतरलेल्या 'साप्ताहिक विचार मंच'च्या वर्धापन दिन

## डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या हस्ते अंकाचे प्रकाशन





अहिल्यानगर : (स. गांवकरी)

अहिल्यानगर जिल्ह्यातील निर्भीड आणि सर्वसामान्य जनतेच्या मनातील स्थान निर्माण करणाऱ्या 'साप्ताहिक विचार मंच' च्या वर्धापन दिन विशेषांकाचे प्रकाशन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या शुभहस्ते उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. यावेळी साप्ताहिक विचार मंच चे संपादक तथा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे दक्षिण नगर जिल्हा सरचिटणीस रमेश बोरुडे पाटील यांनी डॉ. विश्वासराव आरोटे यांची सदिच्छा भेट घेतली. या प्रसंगी त्यांना महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. तसेच साप्ताहिकाच्या वाटचालीबाबत, विविध सामाजिक उपक्रमांबाबत आणि माध्यम क्षेत्रातील कार्याचा आढावा घेण्यात आला. अत्यंत सर्वसामान्य कुटुंबातून पुढे आलेल्या रमेश बोरुडे पाटील यांनी तब्बल ३५ वर्षे पत्रकारिता करत आपल्या मेहनतीच्या बळावर 'साप्ताहिक विचार मंच' ची यशस्वी उभारणी केली आहे. अल्पावधीतच या साप्ताहिकाने वाचकांचा विश्वास संपादन केला असून, अनेक युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देत सामाजिक बांधिलकी जपणारे माध्यम म्हणून आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. या उल्लेखनीय कार्याची दखल घेत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व दैनिक समर्थ गांवकरी समूहाच्या वतीने रमेश बोरुडे पाटील यांचा घड्याळ, पुष्पगुच्छ देऊन सन्मानचिन्हासह सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांच्या भावी वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. याप्रसंगी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे, अहिल्यानगर जिल्हा परिषद प्रमुख भाऊसाहेब पाटील वाकचौरे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे उत्तर नगर जिल्हाध्यक्ष अनिल कोळसे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे संगमनेर तालुकाध्यक्ष संजय गोपाळे तसेच दैनिक समर्थ गांवकरीचे महाव्यवस्थापक संजय फुलसुंदर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात उपस्थितांनी साप्ताहिक विचार मंचच्या आतापर्यंतच्या यशस्वी वाटचालीचे कौतुक करत पुढील कार्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.




हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ३८ए, सोमेश्वर अपार्टमेंट, अदाते/शिंदे हॉस्पिटलजवळ, पुरूषोत्तम व्हिला समोर, वडगांव बुद्रुक, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026 बुधवार दि. ०५ ऑगस्ट २०२६

आवृती- पुणे,अहील्यानगर,मुबंई,ठाणे,पालघर,सिंधुदुर्ग,रत्नागिरी




संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ५ | वर्ष : ४ थे | अंक : ३०६ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com

## करंजा मत्स्य बंदर प्रकल्प कामांसाठी अत्याधुनिक यंत्रणेसह अनुभवी मनुष्यबळाचा वापर करावा : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई (समर्थ गांवकरी)

- दुसऱ्या टप्प्यात पायाभूत सुविधांच्या उभारणीस मिळणार गती
- ४,५०० मेट्रिक टन मत्स्य उत्पादन हाताळण्याची क्षमता

रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील करंजा मत्स्य बंदराच्या प्रकल्पातून वार्षिक ४,५०० मेट्रिक टन मत्स्य उत्पादन हाताळण्याची क्षमता निर्माण होणार आहे. यासाठी पहिल्या टप्प्यातील कामांसाठी १४९ कोटी रुपयांची मान्यता देण्यात आली होती. मंजूर कामे महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने (एमएमबी) पूर्ण केली असून उर्वरित कामे गतीने होण्यासाठी अनुभवी तंत्रज्ञ आणि आधुनिक यंत्रणेचा वापर करावा असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे दिले.

मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली व्यय अग्रक्रम समितीची बैठक झाली. यावेळी विविध विकास प्रकल्पाबाबत चर्चा झाली. मत्स्य व्यवसाय विभागाचे सचिव रामास्वामी एन. यांनी करंजा बंदराच्या विकासाबद्दल माहिती सादर केली. यावेळी मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, गृह विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, वित्त (व्यय) विभागाचे अपर मुख्य सचिव विकास चंद्र रस्तोगी, यासह विविध विभागांचे प्रधान सचिव, सचिव आणि प्रमुख अधिकारी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, करंजा मत्स्य बंदर विकास प्रकल्प ५.२३ हेक्टर क्षेत्रावर विकसित करण्यात येत असून, या बंदरावर ६,६०० मच्छीमारांना सुविधा उपलब्ध होणार आहे. ही कामे पूर्ण करण्यास गती देण्यात यावी. पहिल्या टप्प्यात या प्रकल्पासाठी केंद्र व राज्य सरकारने ५० : ५० या प्रमाणात हिस्सा आहे. आतापर्यंत १३६.३९ कोटी रुपयांचा निधी देण्यात आला आहे. राज्य शासनाकडून ७४.९० कोटी रुपये असा निधी तर केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत केंद्र शासनाच्या



कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयाकडून १४ कोटी रुपये, केंद्रीय नौवहन मंत्रालयाकडून ६०.९० कोटी रुपये मंजूर करण्यात आला आहेत. यामध्ये मंजूर २४ कामांपैकी १३ पूर्ण झाली आहेत. करंजा मत्स्य बंदर विकासासाठी अत्याधुनिक सुविधा विकसित करंजा मत्स्य बंदराचा विकास पूर्ण झाल्यानंतर मच्छीमारांना आधुनिक सुविधा उपलब्ध होण्याबरोबरच मत्स्य व्यवसायाला चालना मिळणार आहे.

## एफसीआरए विधेयकावर अमित शाह बोलण्याची शक्यता

नवी दिल्ली (समर्थ गांवकरी)



संसदेच्या पावसाळी अधिवेशनातील सलग गदारोळ आणि कामकाज थांबल्याचा तिढा सोडवण्यासाठी केंद्र सरकारने बुधवारी विरोधकांशी चर्चेची पावले उचलली आहेत. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांची संसदेतील कार्यालयात भेट घेतली. दोन्ही नेत्यांमध्ये सुमारे ५० मिनिटे चर्चा झाली. सभागृहाचे कामकाज सुरळीत चालवण्यासाठी सरकारकडून सहकार्य मागण्यात आले असून, हा एक 'विश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न' असल्याचे सूत्रांनी सांगितले.

या बैठकीला काँग्रेस खासदार प्रियंका गांधी वाड्रा, गौरव गोगोई आणि के. सी. वेणुगोपाल हे देखील उपस्थित होते. बैठकीत प्रस्तावित सीमांकन विधेयक आणि वादग्रस्त 'एफसीआरए' विधेयकासह सर्व प्रलंबित मुद्यांवर चर्चा झाल्याची माहिती समोर आली आहे. गेल्या १० दिवसांत रिजिजू यांची गांधींसोबतची ही दुसरी भेट आहे. राहुल गांधींच्या भेटीनंतर रिजिजू यांनी गृहमंत्री अमित शाह यांचीही संसदेत भेट घेतली. या अधिवेशनात विरोधी पक्ष सातत्याने गृहमंत्र्यांच्या उपस्थितीची मागणी करत आहेत.

२० जुलैपासून सुरू झालेल्या पावसाळी अधिवेशनात विरोधकांच्या गदारोळांमुळे लोकसभेत एकदाही प्रश्नोत्तर काळ पूर्ण होऊ शकलेला नाही. गोंधळादरम्यानच आतापर्यंत ५ विधेयके विनाचर्चा संमत करण्यात आली आहेत. नीट प्रकरणातील आंदोलकांवर झालेल्या दिल्ली पोलिसांच्या कारवाईविरोधात आणि पंतप्रधान व गृहमंत्र्यांच्या निवेदनासाठी विरोधक आक्रमक झाले आहेत. दरम्यान, एफसीआरए संसदेत चर्चेसाठी आणि मंजुरीसाठी येईल, तेव्हा केंद्रीय गृहमंत्री अमित शाह सभागृहात यावर सविस्तर बोलतील, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे.

## आता हे काय नवीन ? एलपीजी अन् एलएनजीच्या आपत्कालीन साठ्यासाठी ग्राहकांवर कर ? केंद्र सरकारचा मोठा प्लॅन

(समर्थ गांवकरी)

भारतातील ऊर्जा संकट टाळण्यासाठी आणि इंधनाचा आपत्कालीन साठा निर्माण करण्यासाठी केंद्र सरकार ४२ अब्ज डॉलर (सुमारे ३.९९ लाख कोटी रुपये) गोळा करण्याची मोठी योजना आखत असल्याचे एका वृत्तसंस्थेच्या अहवालात म्हटले आहे. या योजनेअंतर्गत देशातील एलपीजी (ङ्झत्र्न्) आणि नैसर्गिक वायू (झछ्न्-उछ्न्) वापरणाऱ्या ग्राहकांवर एक छोटासा अतिरिक्त कर किंवा शुल्क लादण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे. सध्या पश्चिम आशियातील इराण युद्धासारख्या तणावामुळे जागतिक स्तरावर इंधन पुरवठ्याचा प्रश्न निर्माण झाला होता, त्यावर उपाय म्हणून सरकार ही दीर्घकालीन तयारी करत आहे.

कच्च्या तेलासोबत आता एलपीजी आणि एलएनजीचाही साठा

या प्रस्तावाला मंजुरी मिळाल्यास, भारतातील 'स्ट्रॅटेजिक पेट्रोलियम रिझर्व्ह' मध्ये कच्च्या तेलासोबतच प्रथमच स्वयंपाकाचा गॅस (LPG) आणि लिक्विफाइड नॅचरल गॅस (LNG) चा समावेश केला जाईल. याचा थेट अर्थ असा की, आणीबाणीच्या काळात देशात इंधनाचा तुटवडा भासू नये म्हणून केंद्र सरकार आता केवळ कच्च्या



तेलावर अवलंबून न राहता एलपीजी आणि एलएनजीचाही मोठा साठा उभारणार आहे, आणि त्यासाठी ग्राहकांकडून शुल्क वसूल केले जाण्याची शक्यता आहे.

एका गॅस सिलेंडरमागे तब्बल १८ रुपयांची वाढ

अहवालात दिलेल्या माहितीनुसार, पेट्रोलियम मंत्रालय एलपीजीवर १.२९ रुपये प्रतिकिलोग्राम कर लादण्याचा विचार करत आहे. यामुळे सर्वसामान्य घरगुती गॅस सिलेंडरच्या (१४.२ किलोग्रॅम) किंमतीत सुमारे १८ रुपयांची थेट वाढ होऊ शकते. या शुल्कातून वर्षाला सुमारे ४६० दशलक्ष डॉलर महसूल मिळण्याची अपेक्षा आहे. याच धर्तीवर, नैसर्गिक वायूवर (PNG-CNG) प्रति मानक घनमीटर १.४३ रुपये शुल्क प्रस्तावित असून त्यातून वर्षाला १ अब्ज डॉलर जमा करण्याचे उद्दिष्ट आहे. अशा प्रकारे दोन्ही करांमधून दरवर्षी सुमारे १.५ अब्ज डॉलरचा निधी उभारला जाऊ शकतो.

## म्हाडाच्या प्रलंबित गृहनिर्माण प्रकल्पांना तातडीने गती द्या : उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

मुंबई (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) स्तरावरील सर्व प्रलंबित प्रस्ताव तातडीने मार्गी लावावेत. शासन स्तरावरील आवश्यक प्रशासकीय मान्यता आणि निर्णय प्रक्रियेलाही गती देऊन सर्वसामान्य नागरिकांना परवडणारी घरे उपलब्ध करून देण्यास सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असे निर्देश उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिले.

सह्याद्री अतिथीगृह येथे आज झालेल्या बैठकीत पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या विविध गृहनिर्माण प्रकल्पांचा आणि धोरणात्मक विषयांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाचे सभापती शिवाजीराव आढळराव पाटील, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, सांगली जिल्हाधिकारी डॉ. मैनाक घोष हे दूरदृश्य प्रणालीद्वारे, तसेच म्हाडाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी अनिल वानखेडे आणि पुणे म्हाडाचे मुख्याधिकारी राहुल साकोरे यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.



उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या की, सर्वसामान्य नागरिकांना परवडणारी घरे उपलब्ध करून देण्यासाठी म्हाडाची मोठी घरांची लॉटरी लवकरात लवकर जाहीर करावी आणि संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक व कालबद्ध पद्धतीने पूर्ण करावी. दोन किंवा त्यापेक्षा अधिक वेळा लॉटरीत प्रतिसाद न मिळालेल्या सदनिकांची 'फर्स्ट कम, फर्स्ट सर्व्ह' तत्त्वावर तातडीने विक्री करावी, जेणेकरून रिक्त घरे पडून राहणार नाहीत आणि इच्छुक नागरिकांना त्वरित घरे उपलब्ध होतील, असे निर्देशही त्यांनी दिले.

विद्यार्थी तसेच नोकरीसाठी स्थलांतरित होणाऱ्या महिलांच्या गरजा लक्षात घेऊन वर्किंग वुमन हॉस्टेल आणि विद्यार्थी वसतिगृहे भाडेतत्त्वावर उपलब्ध करून देण्याचा उपक्रम म्हाडामार्फत राबविण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. बैठकीत शिरूर (पुणे) येथील १५५.२२ कोटी रुपयांच्या आणि खराबवाडी (पुणे) येथील ८९.४७ कोटी रुपयांच्या म्हाडा गृहनिर्माण प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता देण्याची प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. पुणे मंडळाच्या २० टक्के सर्वसमावेशक गृहनिर्माण योजनेतील लाभार्थ्यांकडून विकासकांकडून आकारण्यात येणाऱ्या अतिरिक्त शुल्काच्या तक्रारी गांभीर्याने घेऊन नागरिकांची आर्थिक पिळवणूक होणार नाही, यासाठी स्पष्ट धोरण तयार करण्याचे निर्देशही उपमुख्यमंत्र्यांनी दिले.

## राज्यात पुन्हा मान्सून सक्रिय! पुढील ४ दिवस मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा; 'या' जिल्ह्यांना ऑरेंज-यलो अलर्ट

मुंबई (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्रात मान्सूनने पुन्हा जोर धरला असून पुढील चार दिवस राज्यातील अनेक भागांमध्ये पावसाचा जोर कायम राहण्याची शक्यता आहे. भारतीय हवामान विभागाने (IMD) ६ ते ९ ऑगस्टदरम्यान कोकण, मध्य महाराष्ट्रातील घाट परिसर तसेच काही जिल्ह्यांसाठी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे. विशेषतः उत्तर मध्य महाराष्ट्रातील घाट परिसर आणि कोकण-गोवा पट्ट्यात पावसाची तीव्रता अधिक राहण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. ६ ऑगस्ट रोजी उत्तर मध्य महाराष्ट्रातील घाट परिसरात तुरळक ठिकाणी मुसळधार ते अति मुसळधार पावसाची शक्यता आहे. याशिवाय कोकण-गोवा आणि दक्षिण मध्य महाराष्ट्रातील घाट परिसरातही अनेक ठिकाणी जोरदार पावसाचा अंदाज आहे. त्यामुळे डोंगराळ भाग, घाटमार्ग आणि नदीकाठच्या परिसरात विशेष काळजी घेण्याचा सल्ला प्रशासनाने दिला आहे.

या जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट : रायगड, पुणे घाट परिसर, सातारा घाट परिसर

या जिल्ह्यांना यलो अलर्ट : ठाणे, रत्नागिरी, नाशिक घाट परिसर, कोल्हापूर घाट परिसर

## एमपीएससीकडून राज्य सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२६ साठी अर्ज सादर करण्यास मुदतवाढ

मुंबई (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२६ साठी अर्ज सादर करण्यास मुदतवाढ दिली आहे. उमेदवारांच्या मागणीचा विचार करून अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत १० ऑगस्ट २०२६ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत, तर ऑनलाइन परीक्षा शुल्क भरण्याची अंतिम मुदत १३ ऑगस्ट २०२६ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत वाढविण्यात आली आहे.

या परीक्षेद्वारे एकूण ५,७०७ पदांसाठी भरती प्रक्रिया राबविण्यात येत असून, पूर्वी प्रसिद्ध करण्यात आलेल्या शुद्धीपत्रकानुसार विविध मागण्यांचा समावेश करून पदसंख्या वाढविण्यात आली आहे. यापूर्वी अर्ज सादर केलेल्या उमेदवारांना नव्याने अर्ज करण्याची आवश्यकता नसून, त्यांनी 'चूलर्लीपीं' या पर्यायातून संबंधित माहिती अद्ययावत करावी, असे आयोगाने स्पष्ट केले आहे. तसेच, आवश्यक कागदपत्रांची पडताळणी नियुक्तीपूर्वी करण्यात येणार असून, पात्रता सिद्ध न झाल्यास नियुक्तीस अपात्र ठरविण्यात येईल, असेही आयोगाने जाहिरातीत नमूद केले आहे. याबाबतचे शुद्धीपत्रक महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या संकेत स्थळावर उपलब्ध असल्याचे आयोगामार्फत कळविण्यात आले आहे.

दैनिक समर्थ गांवकरी इम्पॅक्ट!

## ब्राम्हणवाड्यात अवैध दारु अड्ड्यांवर एलसीबीचे धाडसत्र; १० लाख ५२ हजारांचा मुद्देमाल जप्त!

### चार आरोपींवर गुन्हे दाखल; दैनिक समर्थ गांवकरीने उचललेल्या प्रश्नानंतर मोठी पोलीस कारवाई!

अकोले (समर्थ गांवकरी)

अकोले तालुक्यातील ब्राम्हणवाडा गावात सुरू असलेल्या अवैध दारू विक्रीच्या अड्ड्यांबाबत दैनिक समर्थ गांवकरीने सातत्याने वृत्तांकन करून हा गंभीर प्रश्न प्रशासनासमोर मांडला होता. या वृत्तांची दखल घेत स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) मोठी कारवाई करत ब्राम्हणवाडा-बोटा रस्त्यावरील अवैध दारू अड्ड्यावर छापा टाकला. या कारवाईत तब्बल १० लाख ५२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून चार आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

अहिल्यानगर जिल्ह्यातील अवैध धंद्यांविरोधात सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या विशेष पथकाने ४ ऑगस्ट रोजी अकोले पोलीस ठाण्याच्या हद्दीत ही कारवाई केली. गोपनीय माहितीच्या आधारे ब्राम्हणवाडा-बोटा रस्त्यालगत उभारण्यात आलेल्या पत्र्याच्या शेडवर अचानक छापा टाकण्यात आला. पोलिसांच्या कारवाईमुळे परिसरात एकच खळबळ उडाली.

या छाप्यात अनिष बाबू पटेल (५८), नदीम याकुब पटेल (३१) आणि नाजीम अनिष पटेल (३१), सर्व रा. ब्राम्हणवाडा यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्या ताब्यातून देशी व विदेशी दारूच्या बाटल्या, दोन मोबाईल, रोख रक्कम, टीव्हीएस ज्युपिटर दुचाकी आणि हुंडाई कार असा १० लाख ५१ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या तिघांविरुद्ध अकोले पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ५०८/२०२६ अंतर्गत महाराष्ट्र दारूबंदी कायद्याच्या कलम ६५ (ई) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याच मोहिमेदरम्यान ब्राम्हणवाडा येथील हॉटेल सम्यक येथे अवैधरित्या देशी दारूची विक्री सुरु




असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी तेथेही धाड टाकली. या कारवाईत उत्तम आनंद शिंदे (३४) याला ताब्यात घेऊन त्याच्याकडून १ हजार ७९० रुपयांचा देशी दारूचा साठा जप्त करण्यात आला. त्याच्याविरुद्ध गुन्हा क्रमांक ५०७/२०२६ नोंदविण्यात आला आहे.

विशेष म्हणजे, ब्राम्हणवाडा गावात शाळेजवळ आणि सार्वजनिक ठिकाणी सुरू असलेल्या अवैध दारू विक्रीमुळे विद्यार्थ्यांवर आणि महिलांवर होणाऱ्या परिणामांबाबत दैनिक समर्थ गांवकरीने सविस्तर वृत्त प्रसिद्ध केले होते. या वृत्तातून गावातील नागरिकांच्या भावना आणि संतापाला वाचा फोडण्यात आली होती. त्यानंतर प्रशासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेत कारवाई केल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे.

गावातील नागरिकांनी अवैध दारू व्यवसाय पूर्णपणे बंद करण्याची मागणी करत अशा कारवाया सातत्याने सुरू ठेवण्याचे आवाहन पोलीस प्रशासनाला केले




आहे. अवैध धंद्यांमुळे युवक व्यसनाधीन होत असून सामाजिक वातावरण बिघडत असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

या दोन्ही प्रकरणांचा पुढील तपास अकोले पोलीस ठाणे करत असून, ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली. जिल्ह्यात अवैध व्यवसायांविरोधातील मोहीम पुढेही अधिक तीव्रतेने सुरू राहणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

# एस.एस.जी.एम. कॉलेजमधील प्रा. धनंजय हांडे यांचा सेवापूर्ती सत्कार समारंभ संपन्न

कोपरगाव (समर्थ गांवकरी)

रयत शिक्षण संस्थेच्या श्री सद्गुरू गंगागीर महाराज विज्ञान, गौतम कला व संजीवनी वाणिज्य महाविद्यालय (एस.एस.जी.एम. कॉलेज), कोपरगाव येथील ज्युनिअर इलेक्ट्रॉनिक्स विभागाचे प्राध्यापक श्री. धनंजय हांडे हे नियत वयोमानानुसार ३१ जुलै २०२६ रोजी सेवानिवृत्त होत आहेत. त्यानिमित्त महाविद्यालयात त्यांच्या सेवापूर्ती सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन ड. संदीप वर्पे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्री. हिरालाल महानुभाव उपस्थित होते. महाविद्यालय सेवक कल्याण समितीच्या वतीने मान्यवरांच्या हस्ते प्रा. धनंजय हांडे व सौ. स्वाती हांडे यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला.

प्रमुख पाहुणे हिरालाल महानुभाव यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, प्रा. धनंजय हांडे हे शिस्तप्रिय, नियमबद्ध, प्रामाणिक व कर्तव्यनिष्ठ शिक्षक आहेत. विद्यार्थ्यांमध्ये त्यांना विशेष आदराचे स्थान आहे. सेवानिवृत्तीनंतरही त्यांचा ज्ञानदानाचा प्रवास अविरत सुरू राहावा, अशा शब्दांत त्यांनी शुभेच्छा दिल्या.

अध्यक्षीय भाषणात ॲड. संदीप वर्पे यांनी प्रा. हांडे यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, कामाप्रती निष्ठा, जबाबदारीची जाणीव आणि विद्यार्थ्यांप्रती असलेली बांधिलकी यामुळे त्यांनी आदर्श शिक्षक म्हणून ओळख निर्माण केली आहे. त्यांचा शैक्षणिक प्रवास सर्वांसाठी प्रेरणादायी व मार्गदर्शक आहे.

सत्कारमूर्ती प्रा. धनंजय हांडे यांनी आपल्या मनोगतात ३६ वर्षांच्या प्रदीर्घ सेवाकाळातील अनुभवांना उजाळा देत महाविद्यालयाशी असलेले अतूट नाते भावपूर्ण शब्दांत व्यक्त केले. इलेक्ट्रॉनिक्स विषयाच्या अध्यापनातील विविध अनुभव, विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत शिक्षकाची भूमिका तसेच बोर्ड परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आठवणी त्यांनी यावेळी सांगितल्या. आपल्या यशामागे सहकारी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि कुटुंबीयांचे मोलाचे योगदान असल्याचे नमूद करत त्यांनी सर्वांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.याप्रसंगी श्री. राजेंद्र कुलकर्णी, प्रा. साळुंखे, सौ. स्वाती हांडे आदींनी प्रा. हांडे यांच्या सहवासातील आठवणींना उजाळा देत त्यांच्याविषयीच्या भावना व्यक्त केल्या.

कार्यक्रमाच्या स्वागतपर प्रास्ताविकात प्राचार्य डॉ. माधव सरोदे म्हणाले, सेवापूर्ती म्हणजे जीवनाला लागलेला पूर्णविराम नसून नव्या प्रवासाची सुरुवात आहे. उर्वरित आयुष्यात आपल्या आवडी-निवडी जोपासत ज्ञानदानाचे कार्य अखंड सुरू ठेवावे.. यावेळी त्यांनी प्रा. हांडे यांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व शाखांचे उपप्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, कार्यालयीन अधीक्षक श्री. सुनील गोसावी, आप्तेष्ट, मित्रपरिवार तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालय सेवक कल्याण समितीच्या वतीने करण्यात आले होते. कार्यक्रमात पाहुण्यांचा परिचय ज्युनिअर विभागाचे उपप्राचार्य श्री. रवींद्र हिंगे यांनी करून दिला. डॉ. सुनीता अत्रे व प्रा. ज्योती लामखेडे यांनी सूत्रसंचालन केले, तर श्री. एम.डी. रेवगडे यांनी आभार व्यक्त केले.

# निळवंडेच्या ओव्हरफ्लो पाण्यातून कोपरगाव व राहाता तालुक्यातील गावतळे, पाझर तलाव भरावेत: आ. विवेक कोल्हे यांची मागणी

कोपरगाव (समर्थ गांवकरी)



कोपरगाव व राहाता तालुक्यातील पाणीटंचाईवर उपाययोजना करण्याच्या दृष्टीने निळवंडे धरणाच्या ओव्हरफ्लो पाण्याचा प्रभावी वापर करून परिसरातील गावतळे, पाझर तलाव तसेच जलसाठे भरून देण्यात यावेत, अशी मागणी विधानपरिषद सदस्य आ. विवेक कोल्हे यांनी संबंधित प्रशासनाकडे केली आहे.

धरणक्षेत्रात पाऊस झाल्याने निळवंडे धरणातून मोठ्या प्रमाणात ओव्हरफ्लो पाणी उपलब्ध होत आहे. हे पाणी केवळ नदीपात्रातून वाहून जाऊ न देता त्याचा नियोजनबद्ध वापर करून कोपरगाव व राहाता तालुक्यातील गावतळे, पाझर तलाव आणि लघु जलसाठे भरल्यास भूजल पातळी वाढण्यास मोठी मदत होईल. त्याचबरोबर विहिरी, बोअरवेल आणि इतर पाणीस्रोतांची पाणीधारण क्षमता वाढून शेतकरी, ग्रामस्थ आणि पशुधनाला मोठा दिलासा मिळेल.

आ. विवेक कोल्हे यांनी सांगितले की, पावसाळ्यात उपलब्ध होणाऱ्या अतिरिक्त पाण्याचा योग्य नियोजनाने वापर केल्यास भविष्यातील पाणीटंचाईची तीव्रता मोठ्या प्रमाणात कमी करता येईल. जलसंधारणाच्या दृष्टीने ही अत्यंत महत्त्वाची आणि दूरदृष्टीची योजना असून प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे.यासाठी संबंधित सिंचन विभाग, महसूल प्रशासन आणि स्थानिक यंत्रणांनी समन्वय साधून तातडीने सर्वेक्षण करावे तसेच ज्या गावतळे व पाझर तलावांमध्ये ओव्हरफ्लो पाणी वळविणे शक्य आहे, तेथे आवश्यक उपाययोजना करून जलसाठे भरावेत, अशी मागणीही त्यांनी केली.

ग्रामीण भागातील पाणीप्रश्न सोडविण्यासाठी जलसंधारणाला प्राधान्य देणे ही काळाची गरज असल्याचे नमूद करत आ. विवेक कोल्हे यांनी प्रशासनाने या मागणीवर सकारात्मक निर्णय घेऊन तातडीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

शेतकऱ्यांनी या पाण्यासाठी मागणी आ. विवेक कोल्हे यांच्याकडे केली असून त्यांनी तातडीने या मागणीची दखल घेत कार्यवाहीसाठी प्रशासनाकडे पाठपुरावा केला आहे.

# राहुरीत रंगला खेळ पैठणीचा लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव

राहुरी (समर्थ गांवकरी)

लोकशाहीर आण्णाभाऊ साठे जयंती उत्सवानिमित्त राहुरीतील शनि चौक लक्ष्मी नगर येथे खेळ पैठणीचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

प्रसिद्ध निवेदक गणेशभाऊजी हापसे प्रस्तुत खेळ पैठणीच्या कार्यक्रमात महिला व मुलींचे विविध मनोरंजनात्मक खेळ घेण्यात आले.यामध्ये महिलांचा उदंड प्रतिसाद पहायला मिळाला. खेळ,उखाणे,प्रश्नमंजुषा,लकी ड्रॉ अशा विविध माध्यमातून अनेकांनी बक्षिसे मिळविले. प्रत्येक खेळात महिलांचा सहभाग लक्षणीय ठरला. अंतिम फेरीतील विजेत्या १५ महिलांचा पैठणी साडी देवून मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.





कार्यक्रमाच्या प्रारंभी माजी नगराध्यक्षा डॉ.उषाताई तनपुरे यांच्या हस्ते लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांना पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी नगरसेविका वैशाली नंदकुमार तनपुरे,नगरसेविका प्रियंका रवींद्र आहेर,नगरसेवक सोन्याबापू जगधने नगरसेविका लताबाई बाळू जगधने, निलेश जगधने,कांतीलाल जगधने एन.एम साठे सर, संतोष जगधने,गुनाभाऊ जगधने,राजुभाऊ जगधने, विश्वास जगधने,बाबासाहेब शेलार,लोकशाहीर अण्णाभाऊ साठे उत्सव समितीचे अध्यक्ष सोमनाथ भाऊ जगधने,उपाध्यक्ष मुकुंद जगधने,कार्याध्यक्ष ज्ञानेश्वर जगधने, खजिनदार विलास जगधने, सहखजिनदार अमोल जगधने, सचिव आकाश जगधने,सहसचिव अमित जगधने, सदस्य आनंद जोगदंड, आदित्य जगधने,सचिन जोगदंड, राहुल जगधने,अतुल वाघमारे, राजेंद्र जगधने,दत्ता जोगदंड,अमोल जगधने,सोमनाथ विधाटे आदी उपस्थित होते.सूत्रसंचालन तेजस बाचकर व रवींद्र शेलार यांनी केले. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समितीचे उत्कृष्ट नियोजनाच व प्रसिद्ध निवेदक गणेश हापसे यांच्या विनोदी शैलीतील खेळ पैठणीच्या कार्यक्रमाचे उपस्थितीत महिलांनी विशेष कौतुक केले. महिलांच्या कलागुणांना वाव मिळावा.यासाठी दरवर्षी अशाच कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे अशी मागणी यावेळी महिलांकडून करण्यात आली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समिती व तरुणांनी परिश्रम घेतले.

# विश्व हिंदू परिषदेचे मंदिर अर्चक पुरोहित आयाम व ब्राह्मण सेवा संघाचा उपक्रम

## अर्चक,पुरोहित सेवा शिबिराचे माध्यमातून आरोग्य सेवा व विविध योजनांचे मार्गदर्शन

## मंदिर केंद्रीत व्यवस्था निर्माण झाल्यास हिंदू समाजाला पुनर्वैभव प्राप्त होईल-विवेक कुलकर्णी

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

अहिल्यानगर -पुरोहितांचे हिंदू जीवनातील स्थान महत्त्वाचे आहे. पूर्वी हिंदू जीवन पद्धती मंदिर अर्चक आणि पुरोहित या व्यवस्थेची अनुकूल होती. जोपर्यंत हिंदू जीवनपद्धती मंदिर केंद्रित होती तोपर्यंत हिंदू समाजाकडे वाकडी नजर करून बघण्याची कोणाकडे ही शक्ती नव्हती. ज्यावेळेस हिंदुस्थानात परकीय शक्तींची आक्रमणे झाली.त्यावेळेस त्यांनी मंदिर व्यवस्था मोडीत काढण्यासाठी मंदिरांवर हल्ले करून मंदिराचे अस्तित्व संपवण्यासाठी प्रयत्न केले आहेत.हिंदू धर्मा विरोधात ज्यांनी आक्रमणे केली त्यांची जीवन व्यवस्था आजही उपासना पद्धतीने नुसार आहे.

विश्व हिंदू परिषदेच्या मंदिर, अर्चक, पुरोहित या आयामाच्या वतीने समाजातील अर्चक व पुरोहित यांचे एकत्रीकरण होत आहे. तसेच त्यांच्या आरोग्याच्या समस्या तसेच विविध सरकारी योजनांच्या माध्यमातून त्यांचा विकास होण्यास मदत होईल. मंदिर केंद्रीत व्यवस्था निर्माण झाल्यास हिंदू समाजाला पुनर्वैभव प्राप्त होईल.असे प्रतिपादन विश्व हिंदू परिषद, बजरंग दलाचे राष्ट्रीय सहसंयोजक विवेक कुलकर्णी यांनी केले आहे.

कर्जत येथील साई हॉटेल येथे विश्व हिंदू परिषद,मंदिर अर्चक पुरोहित आयाम व ब्राह्मण सेवा संघ यांच्या संयुक्त विद्यमाने अर्चक, पुरोहित सेवा शिबिर संपन्न झाले.याप्रसंगी प्रमुख उपस्थितीत हभप मोहनबुवा रामदासी, बजरंग दलाचे राष्ट्रीय सहसंयोजक विवेक कुलकर्णी,ड. सुधीर भापकर,स्वागताध्यक्ष प्रसाद ढोकरीकर,महंत पागल बाबा,मंदिर अर्चक पुरोहित आयामाचे प्रांत प्रमुख समीर घरोटे,प्रांत सदस्य





अँड.जयदीप देशपांडे,विभाग प्रमुख गजेंद्र सोनवणे, जिल्हाप्रमुख श्रीकांत नांदापूरकर,महेश वैद्य, डॉ. विलास मढीकर, गौरव पठाडे, इंडो आयरिशचे डॉ.राकेश जोंधळे,उमेश देशमुख,आशिष निलेंगे, स्वप्निल देसाई,अनिल गदादे, विनोद दळवी,प्रसाद शहा आदी मान्यवर उपस्थित होते.

मोहनबुवा रामदासी यांनी धर्म, संस्कार आणि समाज जागृतीच्या माध्यमातून पुरोहितांनी निभावायच्या जबाबदाऱ्यांवर भाष्य केले. तसेच आज समाजामध्ये खऱ्या अर्थाने पौरोहित्य करणाऱ्या कुटुंबातील मुलांची लग्न होत नाहीत.याबद्दल त्यांनी चिंता व्यक्त करतानाच याबाबत विहिंपसारख्या व्यासपीठावरून याबाबत उपाययोजना करण्यात याव्यात अशी सूचना मांडली.

समीर घरोटे म्हणाले, पुरोहित सेवा शिबिराच्या माध्यमातून ग्रामीण व शहरी भागातील अर्चक पुरोहितांना श्रमिक कार्ड व आयुष्यमान भारत कार्ड काढून देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.यामुळे सरकारच्या सर्व योजनांचा लाभ मिळेल व पुरोहित वर्ग सशक्त होईल.

या कार्यक्रमात अर्चक-पुरोहितांसाठी शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती देण्यात आली.ई-श्रम कार्ड,आयुष्यमान भारत कार्ड आदी योजनांचे मार्गदर्शन करण्यात आले.२००हुन अधिक पुरोहितांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

यावेळी कर्जत,जामखेड व श्रीगोंदा,पाटोदा तालुक्यातील अर्चक,पुरोहित वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला अर्चना भणगे यांनी स्वागतगीत सादर केले. गजानन चावरे यांनी प्रास्ताविकात शिबिराच्या उद्दिष्टांची माहिती दिली. सूत्रसंचालन उमेश चावरे यांनी केले.प्रसाद ढोकरीकर यांनी आभार मानले.

# अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेची तीन महिन्यांत धडाकेबाज कामगिरी!

## ४४१ कारवाया, ७८६ आरोपी जेरबंद; तब्बल रु ७.८४ कोटींचा मुद्देमाल जप्त

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या विशेष आदेश व मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेने मागील तीन महिन्यांत (१ मे ते ३१ जुलै २०२६) जिल्ह्यात गुन्हेगारीविरोधात मोठी मोहीम राबवत उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. या कालावधीत ४४१ गुन्हे उघडकीस आणून ७८६ आरोपींवर कारवाई करण्यात आली असून, एकूण रु.७,८४,१२,७१५ किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

खून, दरोडे, जबरी चोरी, घरफोडी, चोरी, अवैध वाळू उपसा, आर्म क्ट, एनडीपीएस,गुटखा,गोमांस तस्करी,जुगार,दारूबंदी आणि इतर बेकायदेशीर धंद्यांवर स्थानिक गुन्हे शाखेने धडक कारवाया करत गुन्हेगारांचे कंबरडे मोडले आहे. जिल्ह्यातील सराईत गुन्हेगारांवर हद्दपार, एमपीडीए आणि मकोका अंतर्गतही कठोर कारवाई करण्यात आली.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या नेतृत्वाखाली स्थानिक गुन्हे शाखेने जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी आणि गुन्हेगारांमध्ये पोलिसांचा धाक निर्माण करण्यासाठी सातत्याने कठोर कारवाई सुरू ठेवली असून, आगामी काळातही अशाच धडक मोहिमा राबविण्यात येणार असल्याचे पोलिसांकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

ठळक कामगिरी –
*४४१ गुन्हे/कारवाया
*७८६ आरोपींवर कारवाई
*रु. ७.८४ कोटींचा मुद्देमाल जप्त
*३० अवैध वाळू प्रकरणांमध्ये रु. ३.६९ कोटींचा मुद्देमाल जप्त
*११ गुटखा प्रकरणांत रु. १.१०कोटींचा माल जप्त
*५ आर्म क्ट कारवाया
*४९ एनडीपीएस कारवाया
*१५३ दारूबंदी कारवाया
*७७ जुगार अड्ड्यांवर छापे

कठोर प्रतिबंधात्मक कारवाई–
६ टोळ्यांतील १५ गुन्हेगार हद्दपार
९ गुन्हेगारांना हद्दपार
३ आरोपींवर एमपीडीए अंतर्गत कारवाई
४ प्रस्तावांत २५ आरोपींवर मकोका लागू

# कुकडी-सीना कालव्यांच्या कामांसाठी निधीची कमतरता भासू देणार नाही : ना. राधाकृष्ण विखे पाटील!

कर्जत (समर्थ गांवकरी)

कुकडी आणि सीना लाभक्षेत्रातील कालव्यांच्या कामांसाठी निधीची कोणतीही कमतरता भासू दिली जाणार नाही. लाभक्षेत्रातील शेवटच्या गावापर्यंत सिंचनाचे पाणी पोहोचावे, हा जलसंपदा विभागाचा उद्देश असून पुढील तीन महिन्यांत सर्व कालव्यांचे सर्वेक्षण करून दुरुस्तीचा प्रकल्प अहवाल सादर करण्याच्या सूचना जलसंपदा तथा पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिल्या. कृष्णा खोरे अंतर्गत कुकडी व सीना लाभक्षेत्रातील कालव्यांबाबत शेतकऱ्यांच्या समस्यांचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीत ते बोलत होते.

मंत्री विखे पाटील यांनी सांगितले की, महायुती सरकारने कुकडी कालव्यांच्या कामांचा नियोजनबद्ध आराखडा तयार केला असून महाराष्ट्र सिंचन सुधारणा कार्यक्रमांतर्गत सीना कालव्यासाठी १९ कोटी रुपयांचा



निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. तसेच अतिवृष्टीत नुकसान झालेल्या चिलवडी कालव्याच्या दुरुस्तीसाठी १ कोटी ५९ लाख रुपये आणि खैरी मध्यम प्रकल्पाच्या दुरुस्तीसाठी ५ कोटी रुपयांच्या निधीस मंजुरी देण्यात आली आहे. कालव्यांची वहन क्षमता वाढविण्यासाठी दुरुस्ती आवश्यक असल्याने सर्व अधिकाऱ्यांनी तीन महिन्यांत सर्वेक्षण पूर्ण करून प्रस्ताव सादर करावेत, असे निर्देश त्यांनी दिले.

महायुती सरकार राज्य दुष्काळमुक्त करण्यासाठी नदीजोड प्रकल्प राबवत असून गोदावरी, मुळा आणि कृष्णा खोऱ्यात कोकणातील अतिरिक्त पाणी वळविण्याचा आराखडा तयार झाल्याची माहिती त्यांनी दिली. जलालपूर येथे बॅरेज उभारणी, उजनी प्रकल्पासाठी २०० कोटी रुपयांची कामे तसेच नीरा नदीतून उजनीत पाणी आणण्याची योजनाही राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी भूसंपादनाच्या प्रश्नावर १२ ऑगस्ट रोजी विशेष बैठक घेण्याचे निर्देश देत शेतकऱ्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.


## जाहीर नोटीस

### निविदा सूचना नोटीस क्र. १/२०२६ – २७

ग्रामपंचायत अवसरी बुद्रुक (तालुका आंबेगाव) जि. पुणे खालील कामाचे सीलबंद निविदा योग्य त्या नोंदणीकृत ठेकेदाराकडून (तीन पाकिटे) बंद लिफाफा पद्धतीने मागवत आहोत. कोऱ्या मा.सरपंच ग्रामपंचायत अवसरी बुद्रुक (तालुका आंबेगाव) जि. पुणे यांच्या कार्यालयाकडे कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सुट्टीचे दिवस वगळता दिनांक ०६/०८/२०२६ ते दिनांक १२/०८/२०२६ या कालावधीमध्ये सकाळी १०.३० ते सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत देण्यात येतील.व भरून पाठवलेल्या मोहोरबंद निविदा /दरपत्रक सुट्टीचे दिवस वगळता दिनांक ०६/०८/२०२६ ते दिनांक १२/०८/२०२६ या कालावधीमध्ये सकाळी १०.३० ते सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील.दिनांक १२/०८/२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजता किंवा तदनंतर त्याच दिवशी कार्यालयीन वेळेत उघडल्या जातील.

| अ. क्र. | कामाचे नाव | लेखाशिर्ष | अंदाज पत्रकिय रक्कम | इसारा रक्कम रुपये | टेंडर फी रु. | कंत्राटदार वर्ग | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत अवसरी बुद्रुक येथील अण्णाभाऊ साठे नगर समाज मंदिर बांधकाम करणे. | दलितवस्ती सुधार योजना निधी | ७००००० /- | १% | ५०० /- | सर्व साधरण खुला | ६ महिने |
| २ | ग्रामपंचायत अवसरी बुद्रुक येथील घनकचरा परिसरास वॉल कंपाउंड करणे. | ग्रामपंचायत १५ वा वित्त आयोग निधी | ५००००० /- | १% | ५०० /- | सर्व साधरण खुला | ६ महिने |

टिप :- १) कोणत्याही निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे त्या मंजूर अगर नामंजूर करण्याचे अधिकार ग्रामपंचायत कडे राखून ठेवले आहेत.
२) कोऱ्या निविदा नमुन्याची रक्कम चलनाने ग्रामपंचायतअवसरी बुद्रुक, ता. आंबेगाव यांचे कार्यालयात भरून उपलब्ध होतील.
३) अनामत रक्कम रोख स्वरुपात चलनाने, धनादेशने, डिमांड ड्राफ्ट अथवा एफ डी स्वरुपात भरावी.
४) ठेकेदाराने कोरि निविदा मागणी अर्जासोबत नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
५) कामाच्या अटी व शर्तींचा तपशील कोऱ्या निविदा संचासोबत प्राप्त होतील.
६) दरपत्रक स्वीकृतीनंतर तक्रार हरकत विचारात घेतली जाणार नाही.
७) उपरोक्त नमूद मुदतीनंतर येणाऱ्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत अवसरी बुद्रुक
ता. आंबेगाव, जि. पुणे

सरपंच
ग्रामपंचायत अवसरी बुद्रुक
ता. आंबेगाव, जि. पुणे


हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ-१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# थोडक्यात पण महत्त्वाचे

## कुकडीच्या चालू आवर्तनातून १३२ कॅनॉलला पाणी; शेतकऱ्यांना मोठा दिलासा

**नेवासा (समर्थ गांवकरी)**

कुकडी प्रकल्पाच्या चालू आवर्तनामधून १३२ कॅनॉलसाठी पाणी सोडण्यात आल्याने परिसरातील शेतकरी बांधवांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या १३२ चारीचे आवर्तन आज सुरू करण्यात आले.



जलसंपदा मंत्री मा. श्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच श्रीगोंदा विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय व कार्यक्षम आमदार मा. श्री विक्रमदादा पाचपुते यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांतून हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती देण्यात आली.

या आवर्तनामुळे लाभधारक क्षेत्रातील शेतकऱ्यांना शेतीसाठी आवश्यक पाणी उपलब्ध होणार असून पिकांच्या वाढीस मोठी मदत होणार आहे. विशेषतः कमी पावसाच्या पार्श्वभूमीवर या निर्णयामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाल्याची भावना व्यक्त होत आहे.

कुकडीचे पाणी उपलब्ध झाल्याने खरीप हंगामातील पिकांना जीवनदान मिळणार असून शेती उत्पादनातही वाढ होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, या निर्णयाबद्दल परिसरातील लाभधारक शेतकऱ्यांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील तसेच आमदार विक्रमदादा पाचपुते यांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत.

## पुष्पावतीच्या विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

**जुन्नर (समर्थ गांवकरी)**

ग्रामविकास मंडळ,ओतूर संचलित पुष्पावती



विद्यालय, डिंगोरे येथे स्वर्गीय वैभव दादा देशमुख प्रतिष्ठान ओतूरयांच्या वतीने ४० गरजू विद्यार्थ्यांना शालेय बॅग विविध शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले. स्वर्गीय वैभव दादा देशमुख यांच्या जन्मदिना निमित्त प्रतिष्ठानतर्फे दरवर्षी समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येतात त्याअंतर्गत विद्यार्थ्यांना सायकली,शालेय बॅग,वह्या,पुस्तके तसेच इतर शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात येते.

याशिवाय महिला दिनानिमित्त परिसरातील कर्तृत्ववान महिलांचा सन्मान, गरजू विद्यार्थ्यांना आर्थिक व शैक्षणिक मदत अशा विविध सामाजिक उपक्रमांद्वारे प्रतिष्ठान सातत्याने समाज सेवा करत आहे.यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक शरद माळवे यांनी मनोगत व्यक्त करताना,स्वर्गीय वैभव दादा देशमुख प्रतिष्ठानचे शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रा तील कार्य अत्यंत प्रेरणादायी आणि स्तुत्य असून, अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मोठा आधार मिळतो, असे प्रतिपादन केले.

या कार्यक्रमास प्रतिष्ठानचे मार्गदर्शक मंगेश डुंबरे, मेघना देशमुख,वैजयंती झुंजारराव, वैभवी देशमुख,वैदही झुंजार राव,जागृती झुंजारराव, पोपट राव नलावडे, दीपक डुंबरे, रोहिदास डुंबरे,सुशील हिंगणे, प्रवीण देशमुख,गणेश देशमुख भूषण देशमुख,स्वप्निल देशमुख स्वराज देशमुख, मंगल डुंबरे व शिवांजली डुंबरे आदी मान्यवर उपस्थित होते.

## पारनेर तालुक्यात 'दहा करोड नशामुक्त महाअभियान' राबविणार

### आमदार काशिनाथ दाते यांची भेट घेऊन ब्रह्माकुमारी संस्थेची चर्चा



**पारनेर (समर्थ गांवकरी)**

तरुण पिढीसमोरील व्यसनाधीनतेच्या वाढत्या विळख्यावर मात करण्यासाठी आणि समाजात व्यापक जनजागृती निर्माण करण्यासाठी प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या वतीने ठोस पावले उचलण्यात येत आहेत. याच पार्श्वभूमीवर पारनेर सेंटरच्या संचालिका ब्रह्माकुमारी साधना दिदी, राम भाई आणि पत्रकार भगवान गायकवाड यांनी पारनेरचे आमदार काशिनाथ दाते सर यांची सदिच्छा भेट घेतली. या अत्यंत महत्त्वपूर्ण भेटीदरम्यान तालुक्यात राबविण्यात येत असलेल्या 'दहा करोड नशामुक्त महाअभियान' या देशव्यापी आणि महत्त्वाकांक्षी उपक्रमाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

आजच्या धकाधकीच्या युगात आणि आधुनिक जीवनशैलीत तरुण पिढी वेगवेगळ्या व्यसनांच्या आहारी जात असल्याचे चित्र अत्यंत चिंताजनक आहे. हे केवळ एका व्यक्तीचे किंवा कुटुंबाचे नसून संपूर्ण समाजाचे आणि देशाचे मोठे नुकसान करत आहे.

# मोतीबिंदूमुळे अंधारात राहू नका; वेळेवर तपासणी करून घ्या : डिसेंट फाऊंडेशनचा आरोग्यदायी उपक्रम

**जुन्नर (समर्थ गांवकरी)**

डिसेंट फाउंडेशन,पुणे आणि शंकरा आय हॉस्पिटल, पनवेल यांच्या संयुक्तविद्यमाने वै. ह.भ.प.गुरुवर्य कोंडाजी बाबा डेरे आश्रम,जुन्नर येथे आयोजित मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्र क्रिया शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या शिबिरात एकूण १०३ नेत्ररुग्णांची मोफत तपासणी करण्यात आली.तपासणी नंतर ३८ रुग्णांची मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी निवड करण्यात आली असून,त्यांना पुढील उपचारांसाठी शंकरा आय हॉस्पिटल, पनवेल येथे पाठविण्यात आले.

डिसेंट फाउंडेशनच्या वतीने ग्रामीण व दुर्गम भागाती ल नागरिकांना दर्जेदारनेत्रसेवा उपलब्ध व्हावी,तसेच आर्थिक अडचणींमुळे उपचारापासून वंचित राहणाऱ्या गरजू रुग्णां ना मदत मिळावी,या उद्देशाने नियमितपणे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्र क्रिया शिबिरे आयोजित केली जात आहेत.या शिबिरात नेत्र तज्ज्ञांकडून रुग्णांचीप्राथमिक नेत्र तपासणी करण्यात आली मोतीबिंदूचे निदान झालेल्या रुग्णांना शस्त्रक्रियेसाठी पुढील उपचारांची माहिती देण्यात आली.मोतीबिंदू शस्त्र क्रियेसाठी निवड झालेल्या रुग्णांना प्रवास,निवास,नाश्ता जेवण,एक महिन्याची औषधे तसेच चष्मा या सर्व सुविधा मोफत उपलब्ध करून दिल्या जातात.त्यामुळे गरजू रुग्णांना उपचाराचा कोणताही आर्थिक भार सहन करावा लागत नाही.

यावेळी डिसेंट फाउंडेशनच्या माध्यमातून एकही गरजू अंधारात राहू नये,हाच संकल्प या भावनेतून नागरिकां नी आपल्या डोळ्यांची नियमित तपासणी करून घ्यावी,तसेच परिसरा तील गरजू व्यक्तींनाही या मोफत आरोग्यसेवेची माहिती द्यावी,असे आवाहन डिसेंट फाउंडेशनचे सचिव डॉ. एफ. बी.आतार यांनी केले डिसेंट फाउंडेशनच्या आरोग्यविषयक उपक्रमांतर्गत गेल्या काही काळापासून जुन्नर तालुक्या सह विविध ग्रामीण भागात मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरे राबविण्यात येत आहेत. या उपक्रमामुळे सात हजारापेक्षा जास्त गरजू नागरिकांना पुन्हा नवी दृष्टी मिळण्यास मदत झाली आहे.

याप्रसंगी शंकरा आय हॉस्पिटलचे शिबीर समन्वयक विजय बामणे,डॉ.श्रेया दास डॉ.मानसी शहा व त्यांची सर्व टीम,श्रावण घोगरे व नागरिक मोठ्या संख्येने उपस्तित होते शिबिराच्या यशस्वी आयोजना साठी डिसेंट फाउंडेशनचे पदाधिकारी,कार्यकर्ते,स्वयंसेवक तसेच शंकरा आय हॉस्पिटल,पनवेलच्या वैद्यकीय पथकाने विशेष परिश्रम घेतले.



# शिवाजीराव नागवडे लॉ कॉलेजच्या विद्यार्थ्यांची श्रीगोंदा जिल्हा व सत्र न्यायालयास शैक्षणिक भेट; ॲड. संदीप कावरे यांचे मार्गदर्शन

**श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)**

श्री शिवाजीराव नागवडे लॉ कॉलेज, श्रीगोंदा येथील द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी श्रीगोंदा जिल्हा व सत्र न्यायालयाची शैक्षणिक भेट आयोजित करण्यात आली. या भेटीद्वारे विद्यार्थ्यांना न्यायालयीन कामकाज, न्यायप्रक्रिया आणि न्यायव्यवस्थेची प्रत्यक्ष माहिती मिळाली. न्यायालयातील विविध प्रक्रिया, सुनावणीची पद्धत आणि कायद्याची अंमलबजावणी यांचा विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष अनुभव घेतला.

शैक्षणिक भेटीनंतर महाविद्यालयात ज्येष्ठ विधिज्ञ ड. संदीप गंगाराम कावरे यांचे झीर्षशीीळेपरश्र ऐींहळली, ऊीरषींळपस, झश्रशरवळपस रपव उेपींशूरपलळपस या विषयावर विशेष मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले. त्यांनी वकिली व्यवसायातील व्यावसायिक नैतिकता, मसुदा लेखन, प्लिडिंग आणि कन्व्हेन्सिंग या विषयांचे सविस्तर विवेचन केले. यशस्वी वकील होण्यासाठी आवश्यक असलेले गुण, कौशल्ये, जबाबदाऱ्या आणि व्यावसायिक आचारसंहितेचे महत्त्व त्यांनी विद्यार्थ्यांना पटवून दिले.

व्याख्यानादरम्यान विद्यार्थ्यांनी संवादात्मक पद्धतीने विविध प्रश्न विचारून शंकांचे निरसन करून घेतले. या मार्गदर्शन सत्रामुळे विद्यार्थ्यांच्या व्यावहारिक विधी ज्ञानात भर पडल्याची भावना उपस्थित विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.



या कार्यक्रमास तुळजाभवानी प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. राजेंद्र नागवडे, सचिव सौ. अनुराधा राजेंद्र नागवडे यांनी शुभेच्छा दिल्या. तसेच तुळजाभवानी प्रतिष्ठानचे निरीक्षक एस. पी. गोलाडे, प्राचार्या डॉ. अंजुला चौबे, प्रा. पी. जे. फाटे, प्रा. रुपाली गोळे, प्रा. दिपाली मोरे तसेच महाविद्यालयातील शिक्षकवृंद उपस्थित होते.

कार्यक्रमास द्वितीय व तृतीय वर्षाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या व्यावहारिक विधी ज्ञानवृद्धीसाठी अशा प्रकारचे उपक्रम भविष्यातही सातत्याने आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती महाविद्यालयाच्या वतीने देण्यात आली.

# काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, माजी राज्यपाल, पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांचे निधनाबाबत प्रतिक्रिया

**संगमनेर (समर्थ गांवकरी)**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, माजी राज्यपाल, पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांच्या निधनाचे वृत्त अत्यंत दुःखद आहे. शिक्षणाच्या माध्यमातून बहुजन समाजातील लाखो विद्यार्थ्यांसाठी ज्ञानाची दारे खुली करणारे दूरदृष्टीचे शिक्षणमहर्षी म्हणून त्यांचे योगदान सदैव स्मरणात राहील.

'डी. वाय. दादा' या नावाने महाराष्ट्रभर परिचित असलेल्या दादांनी अत्यंत तरुण वयात महाराष्ट्र विधानसभेत जनतेचे प्रतिनिधित्व केले. त्यानंतर त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य शिक्षण क्षेत्राच्या उभारणीसाठी समर्पित केले. पुणे, मुंबई, कोल्हापूरसह राज्यातील विविध भागांत त्यांनी उभारलेल्या शैक्षणिक संस्थांमधून आज लाखो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. उत्कृष्ट प्रशासकीय कौशल्य, आधुनिक शिक्षणाचा ध्यास आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाची बांधिलकी ही त्यांच्या कार्याची ओळख होती.

त्यांचे चिरंजीव, माजी मंत्री आणि काँग्रेस विधान परिषदेचे गटनेते सतेज (बंटी) पाटील तसेच संपूर्ण पाटील कुटुंब आज राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात त्यांचा वारसा समर्थपणे पुढे नेत आहे.



> या दुःखद प्रसंगी मी पाटील कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहे. परमेश्वर दिवंगत आत्म्यास चिरशांती देवो आणि पाटील कुटुंबियांना हे अपरिमित दुःख सहन करण्याचे बळ प्रदान करो, हीच भावपूर्ण श्रद्धांजली.
>
> **– बाळासाहेब थोरात**

त्याचप्रमाणे डॉ. डी वाय पाटील यांच्या निधनाबद्दल माजी आमदार डॉ. सुधीर तांबे , सौ दुर्गाताई तांबे , डॉ. जयश्रीताई थोरात, नगराध्यक्ष डॉ. मैथिलीताई तांबे यांच्यासह संगमनेर मधील विविध पदाधिकाऱ्यांनी दुःख व्यक्त केले आहे.

# शाळांमध्ये ओतूर पोलीसांची जनजागुती, सायबर काईम, गुड टच बँड टच व विदयार्थी सुरक्षा यावर मार्गदर्शन



**ओतूर (समर्थ गांवकरी)**

ओतूर पोलीस स्टेशन हद्दीत असलेल्या आणासाहेब वाघीरे कॉलेज, चैतन्य विदयालय, गाडगे महाराज विदयालय, खामुंडी, धोलवड, पुष्पावती विदयालय डिंगोरे, ओतूर नं. १ कन्या शाळांमध्ये ओतूर पोलीसांकडुन जनजागृती कार्यक्रम आयोजीत करण्यात आला आहे.

सायबर सुरक्षे अंतर्गत ऑनलाईन फसवणुक, बनावट लिंक, ओ.टी.पी. बँक खात्याची गोपनीय माहिती, सोशल मिडीया फसवणुक, डिजीटल अटक यांसारख्या सायबर गुन्हयांपासुन बचाव करण्यसाठी घ्यावयाची दक्षता याबाबत विदयार्थ्यांना माहिती देण्यात आली आहे. तसेच सायबर गुन्हा घडल्यास १९३० या हेल्पलाईन नंबर व संबंधीत पोलीस स्टेशनशी संपर्क साधण्याचे आवाहान पोलीसांकडुन करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे डायल ११२ आपत्कालीन सेवा, अंमली पदार्थ विरोधी जनजागृती तसेच सायबर सुरक्षा जनजागृती या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले आहे. डायल ११२ या आपत्कालीन सेवेचा वापर कोणत्या प्रसंगी करावा, आपत्कालीन परिस्थीतीत त्वरीत मदत कशी मिळवावी याबाबत माहिती देण्यात आली आहे. अंमली पदार्थांचे दुष्परीनाम, त्यांचे सेवन व तस्करी रोखण्यासाठी विदयार्थी व नागरीकांची भुमीका, संशयास्पद हालचालींची माहिती पोलीसांना देण्याचे महत्व या विषयी मार्गदर्शन करण्यात आले आहे.

# १ रुपयात दूध भेसळ ओळखण्याची पेटंट मिळवलेल्या प्रोजेक्टला तत्कालीन गुजरात व महाराष्ट्रातील राजकारण्यांची आली होती आडकाठी !

## देशातील नामांकित कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरूंचे २०२२ मधील वक्तव्य चर्चेत

**राहूरी (समर्थ गांवकरी)**

सध्या राज्यभरात एफडीआय तथा अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या सर्वत्र वेगवेगळ्या विभागांमध्ये धाड व छापे टाकून दूध भेसळ व अन्य भेसळी चा पोलखोल सुरू आहे.

सर्वत्र भेसळ करणाऱ्यांमध्ये घबराटीचे व आपल्या संस्था वाचवण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे चित्र आहे . अनेकांनी आपली भेसळीची दुकानदारी बंद केल्याचेही चर्चा व चित्र दिसून येत आहे .

असे असताना याच दूध भेसळी संदर्भात चार वर्षांपूर्वी गुजरात येथील एका विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरुंनी या दूध भेसळीबाबत नगर जिल्ह्यातील एका कार्यक्रमात विवेचन करत पुढील धोका व्यक्त केला होता . याची सध्या चर्चा सुरू आहे .

मार्च २०२२ साली देवळाली प्रवरा येथे आण्णासाहेब पाटील कदम शेती व ग्रामविकास प्रतिष्ठान आयोजित दूध उत्पादक शेतकरी मेळाव्यात गुजरात मधिल आणंद विद्यापीठाचे तात्कालीन कुलगुरू मा.श्री.मदनगोपालजी वार्ष्णेयजी यांनी केलेले वास्तव भाकित

आज महाराष्ट्राचे ऋऊ आयुक्त श्री. तुकाराम मुंढे यांनी सत्य जगासमोर उघड केले आहे.



मार्च २०२२ मध्ये तत्कालिन कुलगूरू डॉ. वाष्र्णेय म्हणाले होते की , गुजरातमधील आनंद विद्यापीठात दुग्ध क्रांतीचे जनक डॉ. वर्गीस कुरियन यांच्या नंतर आपण कुलगुरुपदी कार्यरत असताना दूध भेसळ ओळखण्यासाठीचे एक प्रोजेक्ट तयार करून तिचे पेटंटही मिळवले होते. त्यात भेसळ ओळखणाऱ्या आठ पद्धतीची भेसळ अवघ्या एक रुपयात ओळखण्याचे सोपे व चांगले तंत्रज्ञान विकसित केले होते. यासाठी महाराष्ट्रातील एका कंपनीला कंत्राट देण्यात आले होते . मात्र गुजरात आणि महाराष्ट्रातील राजकारणाची आडकाठी त्याला आल्याची खंत डॉक्टर वाष्र्णेय यांनी यावेळी व्यक्त केली होती.

डॉ. वाष्र्णेय म्हणाले होते की , जगात दूध उत्पादन वाढीचा दर केवळ १.३ इतका असून हाच दर भारतात ६.५ टक्के म्हणजे जगाच्या तुलनेत चौपट इतका आहे . वर्षाला २०८ मिलियन टन इतके दूध उत्पादन भारतात होते . त्यातून ७.३ लाख करोड रुपये आपल्या अर्थव्यवस्थेत भर पडत आहे. दूध व्यवसायाला पूर्वी शेतीपूरक व्यवसाय असे म्हटले जायचे .

मात्र आज हाच स्वतंत्र व उत्तम असा व्यवसाय बनलेला आहे. बाहेरच्या परदेशी गायांपासून बनणाऱ्या संकरित जातीमुळे भावी पिढीला अनेक दुष्परिणाम भोगण्यापेक्षा आपल्याच देशातील गीर, साहीवाल, लाल सिंधी, डांगी, लाल कंधारी, खिलार अशा ४० हून अधिक देशी गाई दूध उत्पादकांनी जोपासली पाहिजे.

यात आपल्या राज्यातील सांगली सातारच्या खिलार जातीची देशी गाई आपला गौरव असून ब्राझील मध्ये भारतीय वंशाच्या गीर गाईवर संशोधन करुन ती ८५ लिटर दूध देण्याइतकी समृद्ध बनवली . मात्र आम्ही आमच्या गायींची गुणवत्ता तिच्याकडे अक्षम्य दुर्लक्ष करून घसरवली आहे. ती सुधारण्यासाठी प्रयत्न होण्याची आवश्यकता वाष्र्णेय यांनी प्रतिपादन केली.

याच देशी गाईं मुळे आपली पुढची पिढी बलवान होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला . भारतात दुधाचा सर्वात मोठा दोष हा दुधातील भेसळ असून हे प्रमाण देशात ६८ % आहे हे एक भयाण वास्तव आहे.

# आषाढी एकादशीनिमित्त विठ्ठल चरणी भक्तिरंगाची भावमुद्रा

## नृत्य दर्पण अकॅडमीच्या विद्यार्थिनींच्या मनोहारी नृत्याविष्कारांनी जिंकली रसिकांची मने

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त गुलमोहर रोड येथील श्री विठ्ठल मंदिर भक्तिरसाने न्हाऊन निघाले. नृत्य दर्पण डान्स अकॅडमीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भक्तिरंग या विशेष नृत्यसेवेत विद्यार्थिनींनी विठ्ठल, भगवान शंकर, आदिशक्ती आणि संतपरंपरेवरील भक्तिगीतांवर सादर केलेल्या मनोहारी नृत्याविष्कारांनी मंदिर परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला. टाळ्यांच्या कडकडाटात प्रत्येक सादरीकरणाला उत्स्फूर्त दाद मिळाली.

कार्यक्रमाची सुरुवात मंगलमय गणेश वंदनेने झाली. अनुराधा, आराध्या, हर्षिता, थरूनिका, श्रीनिका आणि स्वरा यांनी गणरायाच्या नृत्याविष्कारातून कार्यक्रमाची सुरेख सुरुवात केली. त्यानंतर श्रावणी, गौरी, सावली, गायत्री आणि हर्षदा यांनी देवी स्तुतीवरील नृत्यातून भक्तीची अनुभूती दिली. चंद्रचूड शिव या गीतावर मैत्रेयी, ईश्वरी, गिरीजा, आदिती, सई आणि संस्कृती यांनी भगवान शंकराच्या विविध रूपांचे प्रभावी सादरीकरण करून उपस्थितांची वाहवा मिळवली.

अबीर गुलाल या विठ्ठल भक्तिगीतावर हर्षदा, सायली, समृद्धी, वैदेश्री, श्रुती, वैष्णवी आणि अदिती यांनी वारकरी संप्रदायाची भक्तिभावपूर्ण परंपरा साकारली. अधिगिरी नंदनी या देवी स्तुतीवर श्रव्या, श्रावणी, गौरी, सावली आणि हर्षदा यांनी, तर नाथ प्रभू या शिवस्तुतीवर श्रुती, सायली, समृद्धी, वेदश्री आणि वैभवी यांनी भावपूर्ण नृत्याविष्कार सादर केला.

कार्यक्रमातील आणखी एक आकर्षण ठरले ते खेळ मांडीयेला या विठ्ठल भक्तिगीतावरील नृत्य. रिमा, अनंती, प्रतीक्षा, स्नेहल, स्वरा, थरूनिका आणि कस्तुरी यांनी सादर केलेल्या या नृत्याने उपस्थितांना अक्षरशः वारकरी भक्तीत रंगवून टाकले.

समारोप अवघा रंग एक झाला या संतांच्या अभंगावरील सामूहिक नृत्याने झाला. मैत्रेयी, ईश्वरी, सई, आनंदी, संस्कृती आणि आदिती यांनी सादर केलेल्या या अंतिम नृत्याने संपूर्ण मंदिर परिसर भक्तिरंगात रंगून गेला.

कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन भारती फडके यांनी केले. नृत्य दर्पण डान्स अकॅडमीच्या संचालिका सौ. अपर्णा रोहित थत्ते यांनी विद्यार्थिनींना नृत्याचे प्रशिक्षण व मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सौ. सुजाता कुलकर्णी, सौ. अश्विनी भावे, सौ. सुजाता रेपे आणि सौ. रिमा कुलकर्णी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

आषाढी एकादशीच्या पवित्र पर्वावर विठ्ठल चरणी अर्पण करण्यात आलेल्या या भक्तिरंगमय नृत्यसेवेने उपस्थित भाविकांना भक्ती, संस्कृती आणि कलेचा अनोखा संगम अनुभवायला मिळाला. या नृत्यसेवेसाठी संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल श्री विठ्ठल मंदिराच्या संचालक मंडळाप्रती आयोजकांनी कृतज्ञता व्यक्त केली.



## थोडक्यात पण महत्त्वाचे

### शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांच्या यशाने महादजी शिंदे इंग्लिश मीडियम स्कूलचा गौरव

**कारंजकर कुटुंबाकडून शिक्षक-सेवकांचा सत्कार**



**श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)**

महादजी शिंदे इंग्लिश मीडियम स्कूलच्या इयत्ता पाचवी व आठवीतील विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत पाच विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक ठरल्याने विद्यालयात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. या अभिमानास्पद यशानिमित्त कारंजकर कुटुंबाच्या वतीने विद्यालयातील शिक्षक व सेवकांचा सत्कार समारंभ उत्साहात आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमात कारंजकर कुटुंबाने विद्यालयाला आकर्षक स्मृतिचिन्ह (ट्रॉफी) प्रदान करून गुणवत्तापूर्ण शैक्षणिक कार्याचा गौरव केला. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या यशामागे शिक्षकांचे समर्पित मार्गदर्शन, पालकांचे सहकार्य आणि विद्यार्थ्यांची मेहनत हे महत्त्वाचे घटक असल्याचे सांगत विद्यालयाचे अभिनंदन केले.

या प्रसंगी रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य श्री बाबासाहेबजी भोस, उत्तर विभाग गुणवत्ता विकास कक्षाचे मार्गदर्शक मा. श्री काकासाहेब वाळुंजकर, महादजी शिंदे विद्यालयाचे प्राचार्य श्री दिलीप भुजबळ, ज्येष्ठ पत्रकार श्री पिटर रणसिंग, श्री माधव बनसोडे, श्री विष्णू धुमाळ, श्री दत्तात्रय पाचपुते तसेच राष्ट्रपती पुरस्कार विजेते श्री रामदास ठाकर सर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

मान्यवरांनी शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांचे, त्यांच्या पालकांचे तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करत भविष्यातही विद्यालयाने अशीच यशस्वी परंपरा कायम ठेवावी, असा विश्वास व्यक्त केला.

### त्रिदल माजी सैनिक सेवा संघाची स्थापना

**माजी सैनिक मनसुख वाबळे यांचा ११ हजार रुपयांचा मदतीचा हात**

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**



त्रिदल माजी सैनिक सेवा संघाची स्थापना उत्साहात करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अशोक चौधरी होते. आमदार अक्षय कर्डिले व आमदार प्राजक्त तनपुरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी आमदार अक्षय कर्डिले व आमदार प्राजक्त तनपुरे यांनी माजी सैनिकांच्या विविध समस्या शासनस्तरावर पाठपुरावा करून सोडविण्याचे आश्वासन दिले.

संघाच्या कार्यासाठी माजी सैनिक मनसुख वाबळे यांनी ११ हजार रुपयांचा धनादेश देऊन आर्थिक मदतीचा हात दिला.

माजी सैनिक मनसुख वाबळे हे समाजकार्यात सातत्याने कार्यरत असून उद्योग-व्यवसायाच्या माध्यमातून समाजातील तळागाळातील गरजू व्यक्तींना नेहमीच मदतीचा हात देत असतात. माजी सैनिकांच्या कल्याणासाठी ते कायम पुढाकार घेत असून त्यांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी मार्गदर्शन करतात. त्यांच्या सुरक्षा गार्ड एजन्सीच्या माध्यमातून अनेक माजी सैनिकांना रोजगार उपलब्ध करून देत त्यांनी त्यांच्या सन्मानाने पुनर्वसनासाठी उल्लेखनीय योगदान दिले आहे.

### पारनेर नगरपंचायत अंतर्गत ४५ लाखांचा रस्ता निकृष्ट

**सुनीताताई सोबले यांची चौकशीची मागणी**



**बीएसएनएल ऑफिस ते विधाटे वस्ती रस्त्याच्या दर्जावर प्रश्नचिन्ह; सार्वजनिक बांधकाम विभागाला निवेदन**

**पारनेर (समर्थ गांवकरी)**

पारनेर नगरपंचायत हद्दीतील बीएसएनएल ऑफिस ते विधाटे वस्ती या रस्त्याच्या निकृष्ट दर्जाच्या कामाची तात्काळ चौकशी करून रस्ता दुरुस्त करावा, तसेच संबंधित काम पूर्ण झाले आहे की अपूर्ण, याबाबत नगरपंचायतीने लेखी खुलासा करावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्त्या सौ. सुनीताताई सोबले यांनी पारनेर सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपकार्यकारी अभियंता यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, या रस्त्याच्या डांबरीकरणासाठी सुमारे ४५ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. मात्र काम पूर्ण झाल्यानंतर अल्पावधीतच रस्त्याची गुणवत्ता अत्यंत निकृष्ट असल्याचे दिसून आले आहे. अनेक ठिकाणी रस्ता उखडलेला असून काही भागातील काम अपूर्ण असल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे कामाच्या दर्जाबाबत नागरिकांमध्ये गंभीर शंका निर्माण झाली आहे.

# अल्पसंख्याकांच्या विकासासाठी खा. लंके आक्रमक

## सामाजिक-आर्थिक उन्नतीसाठी केंद्राकडे ठोस प्रस्ताव



**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर (दक्षिण) लोकसभा मतदारसंघातील अल्पसंख्याक बहुल भागांमध्ये शिक्षण, आरोग्य, पिण्याचे पाणी, स्वच्छता, रस्ते, कौशल्य विकास आणि इतर मूलभूत सुविधा सक्षम करण्यासाठी पंतप्रधान जन विकास कार्यक्रम अंतर्गत विविध विकासकामांना तातडीने मंजुरी देऊन आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा, अशी जोरदार मागणी खासदार नीलेश लंके यांनी केंद्रीय अल्पसंख्याक कार्यमंत्री किरण रिजिजू यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.

खासदार लंके यांनी सादर केलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, लोकसभा मतदारसंघातील अनेक अल्पसंख्याक बहुल वस्त्या आजही विकासाच्या मुख्य प्रवाहापासून काही प्रमाणात दूर आहेत. या भागांमध्ये शिक्षण, आरोग्य, स्वच्छता, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, अंतर्गत रस्ते, अंगणवाडी, सामुदायिक सुविधा आणि रोजगाराभिमुख प्रशिक्षण केंद्रांचा अभाव असल्याने नागरिकांना दैनंदिन जीवनात अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. याचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर, युवकांच्या रोजगाराच्या संधींवर आणि महिलांच्या सामाजिक सक्षमीकरणावर होत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले आहे.

पीएमजेव्हीके ही केंद्र सरकारची महत्त्वाची योजना असून अल्पसंख्याक बहुल भागांमध्ये सामाजिक आणि आर्थिक विकासाला गती देण्यासाठी ही योजना प्रभावी माध्यम ठरू शकते. त्यामुळे या योजनेअंतर्गत मतदारसंघातील प्राधान्याच्या विकासकामांचा समावेश करून त्यांना तातडीने मंजुरी देण्यात यावी, अशी मागणी खासदार लंके यांनी केली आहे.

निवेदनामध्ये शाळांच्या नवीन इमारती, विद्यार्थ्यांसाठी सुसज्ज वसतिगृहे, प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रे, कौशल्य विकास केंद्रे, सामुदायिक भवन, अंगणवाडी केंद्रे, पिण्याच्या पाण्याच्या योजना, स्वच्छता सुविधा, अंतर्गत रस्त्यांचे बांधकाम, गटारे आणि इतर आवश्यक पायाभूत सुविधांसाठी विशेष निधी उपलब्ध करून देण्याची विनंती करण्यात आली आहे. या सुविधा उभारल्यास नागरिकांचे जीवनमान उंचावण्यास मोठी मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी कौशल्य विकास केंद्रांना विशेष प्राधान्य देण्याची आवश्यकता असल्याचेही खासदार लंके यांनी अधोरेखित केले आहे. उद्योगांच्या गरजेनुसार प्रशिक्षण उपलब्ध झाल्यास अल्पसंख्याक समाजातील युवक-युवती स्वयंरोजगार आणि रोजगाराच्या नव्या संधी निर्माण करू शकतील, असे त्यांनी नमूद केले आहे.

शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रात भक्कम पायाभूत सुविधा उभारणे ही काळाची गरज असल्याचे सांगत त्यांनी ग्रामीण आणि उपेक्षित भागांतील विद्यार्थ्यांना दर्जेदार शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देण्याबरोबरच सर्वसामान्य नागरिकांना त्यांच्या परिसरातच दर्जेदार आरोग्य सेवा मिळण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

अल्पसंख्याक समाजाचा विकास हा केवळ पायाभूत सुविधांपुरता मर्यादित नसून सामाजिक समावेशन, शैक्षणिक प्रगती, आर्थिक स्वावलंबन आणि जीवनमान उंचावण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व घटकांचा समन्वय साधणे गरजेचे असल्याचे खासदार लंके यांनी निवेदनात स्पष्ट केले आहे.

केंद्र सरकारने या मागणीचा सकारात्मक विचार करून पीएमजेव्हीके योजनेंतर्गत आवश्यक निधी तातडीने मंजूर केल्यास अहिल्यानगर (दक्षिण) लोकसभा मतदारसंघातील अल्पसंख्याक बहुल भागांच्या विकासाला मोठी चालना मिळेल. तसेच हजारो नागरिकांना शिक्षण, आरोग्य, पिण्याचे पाणी, स्वच्छता, रस्ते आणि रोजगाराभिमुख प्रशिक्षणाच्या सुविधा उपलब्ध होऊन त्यांच्या जीवनमानात गुणात्मक सुधारणा होईल, अशी अपेक्षा खासदार नीलेश लंके यांनी व्यक्त केली आहे.

## ॲड. प्रकाश संसारे यांची काँग्रेसच्या एस.सी. विभागाच्या राज्य सरचिटणीसपदी नियुक्ती

**देवळाली प्रवरा (समर्थ गांवकरी)**



देवळाली प्रवरा येथील ज्येष्ठ विधिज्ञ व काँग्रेसचे सक्रिय पदाधिकारी ड. प्रकाश संसारे यांची महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी अंतर्गत एस.सी. विभाग कार्यकारी समितीच्या राज्य सरचिटणीस पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या या नियुक्तीमुळे देवळाली प्रवरासह राहुरी तालुका आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

एस.सी. विभागाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा माजी मंत्री आ. राजेंद्र पाल गौतम यांनी ड. प्रकाश संसारे यांच्या सामाजिक कार्याची, संघटन कौशल्याची आणि पक्षाप्रती असलेल्या निष्ठेची दखल घेत ही नियुक्ती जाहीर केली आहे. राज्य सरचिटणीस या जबाबदारीच्या माध्यमातून अनुसूचित जाती समाजाच्या प्रश्नांना न्याय मिळवून देणे, पक्ष संघटना अधिक सक्षम करणे तसेच राज्यभर पक्षाच्या विविध उपक्रमांना गती देण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे.

या नियुक्तीबद्दल काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, खासदार शिवाजीराव काळगे, खासदार चंद्रकांत हंडोरे, आमदार हेमंत ओगले, श्रीरामपुरचे नगराध्यक्ष करण ससाणे, जिल्हाध्यक्ष सचिन गुजर, तसेच देवळाली प्रवरा काँग्रेस कमिटीच्या सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि विविध सामाजिक संघटनांनी ड. प्रकाश संसारे यांचे अभिनंदन केले आहे.

## खेळाडूंना सार्थक वेलफेअर फाउंडेशनचे पाठबळ; १२ हजारांचे क्रीडा साहित्य भेट

**श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)**




श्रीगोंदा तालुक्यातील देवदैठण येथील श्री संतश्रेष्ठ निंबराज महाराज विद्याधाम प्रशालेतील खेळाडूंना सार्थक वेलफेअर फाउंडेशन, पुणे यांच्या वतीने क्रीडा साहित्य भेट देण्यात आले.

गेल्या अनेक वर्षांपासून जिल्हा, विभागीय व राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये प्रशालेतील खेळाडूंनी केलेल्या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत फाउंडेशनने ही मदत केली आहे. विद्यार्थ्यांना भविष्यात अधिक प्रोत्साहन मिळावे आणि त्यांनी क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करावे, या उद्देशाने स्वाती नामजोशी यांच्या माध्यमातून सुमारे १२ हजार रुपये किंमतीचे क्रीडा साहित्य प्रदान करण्यात आले.

यामध्ये सहा स्पाईक शूज, तीन बॅडमिंटन सेट, २४ शटल कॉक, तीन फुटबॉल, एक व्हॉलीबॉल, एक थाळी आणि १२ टेनिस बॉल यांचा समावेश आहे. प्रशालेच्या वतीने शिक्षक अमोल कातोरे व खेळाडूंनी या साहित्याचा स्वीकार केला.

या साहित्याचा विद्यार्थ्यांना सरावासाठी मोठा फायदा होणार असून ते आगामी स्पर्धांमध्ये अधिक चांगली कामगिरी करतील, असा विश्वास मुख्याध्यापक पी. जे. मेरगळ आणि पर्यवेक्षक नामदेव डुंबरे यांनी व्यक्त केला.

> ग्रामीण भागातील खेळाडू, विद्यार्थी व शाळांना आवश्यक सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी सार्थक वेलफेअर फाउंडेशन सातत्याने मदत करत असते. या माध्यमातून विद्यार्थी सर्वांगीण विकास साधून प्रगतीच्या दिशेने वाटचाल करतील, अशी अपेक्षा आहे.
>
> **– स्वाती नामजोशी, सार्थक वेलफेअर फाउंडेशन**

## महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या अहिल्यानगर जिल्हा सरचिटणीस पदी रमेश बोरुडे

**राहुरी (समर्थ गांवकरी)**



राज्यातील अग्रगण्य समजल्या जाणार्या महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई शाखा अहिल्यानगर दक्षिण जिल्हा सरचिटणीस पदी जेष्ठ पत्रकार रमेश प्रभाकर बोरुडे यांची निवड करण्यात आली. प्रदेश सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे यांनी निवडीचे पत्र दिले.

राज्यात महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ हा पत्रकारांच्या विविध मागण्यांसाठी शासकीय स्तरावर न्याय मिळवून देणारी संघटना म्हणून राज्यात वेगळी ओळख आहे. काम संघटनेचे प्रदेश सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या मार्गदर्शनाखाली अहिल्यानगर जिल्ह्यातही संघटनेचे काम जोमाने सुरू आहे. संघटना बळकटीसाठी जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील विविध वृत्तपत्रांमध्ये काम करणार्या पत्रकारांचा संघटनेत सहभागी करून संघटना मजबूत करण्यात येत आहे. अहिल्यानगर जिल्हा दक्षिण विभागाची सरचिटणीस पदाची जबाबदारी राहुरी तालुक्यात गेली चाळीस वर्षांपासून सातत्याने विविध वृत्तपत्राच्या माध्यमातून पत्रकारिता क्षेत्रात मोलाची कामगिरी करत असलेले जेष्ठ पत्रकार रमेश प्रभाकर बोरुडे यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. तालुक्यातील विविध विषयांवर लिखाण करुन अन्याय अत्याचारा विरोधात वाचा फोडली आहे. जिल्ह्यातील लोकप्रिय दैनिकांत राजकीय, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक आदी विविध विषयांवर आपल्या लेखणीने छाप पाडली आहे. तालुक्यातील पत्रकार संघटनेत यापूर्वी विविध पदांवर काम केले असल्याने त्यांच्या अनुभवाचा व संघटन कौशल्याचा फायदा निश्चितच संघटनेला होणार असल्याने प्रतिपादन संघटनेचे प्रदेश सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे यांनी श्री. बोरुडे यांच्या सत्कारप्रसंगी केले.

रमेश बोरुडे हे साप्ताहिक विचारमंच चे संपादक असून अखिल भारतीय मराठा महासंघाचे जिल्हा सरचिटणीस म्हणून कार्यरत आहेत. या माध्यमातून दक्षिण भागात त्यांचे चांगला संपर्क आहे.

त्यांच्या या निवडीबद्दल संघटनेचे प्रदेशाध्यक्ष निलेश सोमाणी, राज्य संघटक संजय भोकरे, प्रदेश सरचिटणीस डॉ विश्वासराव आरोटे, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख भाऊसाहेब वाकचौरे, उत्तर जिल्हाध्यक्ष अनिल कोळसे यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## पुष्पावती विद्यालयात महिला सुरक्षितता व बाल संरक्षण विषयक जनजागृती कार्यक्रम

**ओतूर (समर्थ गांवकरी)**

ग्रामविकास मंडळ ओतूर संचलित पुष्पावती विद्यालय, डिंगोरे येथे ओतूर पोलीस स्टेशनच्या पोलीस कॉन्स्टेबल तथा निर्भया पथकाच्या प्रमुख सौ. मयुरी खोसे यांनी इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थिनींना महिला सुरक्षितता, बाल लैंगिक शोषण प्रतिबंध व सायबर सुरक्षितता या विषयांवर सखोल मार्गदर्शन केले.



कार्यक्रमात त्यांनी 'गुड टच – बॅड टच' या संकल्पनेचे महत्त्व विद्यार्थिनींना सोप्या भाषेत समजावून सांगितले. कोणत्याही प्रकारचा अयोग्य स्पर्श, छळ किंवा संशयास्पद वर्तन झाल्यास भीती न बाळगता त्वरित पालक, शिक्षक किंवा विश्वासू व्यक्तींना माहिती देणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी सोशल मीडियाचा जबाबदारीने वापर कसा करावा, अनोळखी व्यक्तींशी संपर्क टाळणे, वैयक्तिक माहिती, फोटो किंवा पासवर्ड शेअर न करणे, सायबर गुन्हे व महिला अत्याचारांपासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी कोणती काळजी घ्यावी, याबाबतही त्यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.

समाजामध्ये वावरताना आजूबाजूच्या परिस्थितीचे भान ठेवणे, संशयास्पद व्यक्ती किंवा घटनांपासून सावध राहणे, स्वतःची सुरक्षितता कशी जपावी, तसेच कुणी धमकावत असेल, त्रास देत असेल किंवा छळ करत असेल तर त्याविरोधात धैर्याने आवाज उठवून त्वरित संबंधित यंत्रणेशी संपर्क साधण्याचे आवाहन त्यांनी केले.

# आदिवासी भागात पावसाचा कहर घराची भिंत कोसळून महिला जखमी

## भात खाचरांचे देखील नुकसान






**जुन्नर (समर्थ गांवकरी)**

जुन्नर तालुक्यातील माळशेज पट्टयात सुरू असले ल्या मुसळधार पावसाचामोठा कहर वाढत आहे ज्याचा फटका मढ आणि उत्तरे कडे मांडवे गावाला बसला. दि:-१ ते ३ऑगस्ट दरम्यान झालेल्या तुफान पावसामुळे मढ येथे घराची भिंत कोसळून मंदाबाई शांताराम सदाकाळ वय ७५ वर्षे, या गंभीर जखमी झाल्या. त्यांच्या मुलाने प्रसंगावधान राखत तातडीने मदत केल्या मुळे मोठी जीवितहानी टळली तर अतिदुर्गम आदिवासीभागा तील पुताचीवाडी मांडवे येथे धोंडू सखाराम दाभाडे यांच्या राहत्या घराची भिंतकोसळली

मिळालेल्या माहितीनुसार, मढ येथील शांताराम रामभाऊ सदाकाळ यांच्या घरात ही दुर्घटना घडली.सलग सुरु असलेल्या मुसळधार पावसा मुळे घरांची भिंत कमकुवत झाली होती. सोमवारीसकाळी मंदाबाई सदाकाळ या आंघोळ करून स्वयंपाकघराकडे जात असताना अचानक भिंत त्यांच्या अंगावर कोसळली. विटा आणि मातीच्या ढिगाऱ्या खाली त्या अडकल्या.यावेळी त्यांचा मुलगा संतोषसदाकाळ यांनी धाडस दाखवत विटा व माती बाजूला करून आईला सुरक्षित बाहेर काढले.त्यांच्या तत्परतेमुळे मोठी दुर्घटना टळली या घटनेत घरातील संसारोपयोगी वस्तूंचेही मोठे नुकसान झाले असून जखमी मंदाबाई यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले.तर दुसरीकडे मांडवे गावच्या हद्दीतील पुताचीवाडीतील धोंडू सखाराम दाभाडे यांच्या राहत्या घराची भिंत कोसळ ली मात्र ही बाहेरच्या बाजूला पडल्याने कोणालाही इजा झाली नाही.याशिवाय याच मांडवे गावच्या हद्दीतील अनेक आदिवासी शेतकरी बांधवांच्या भात खाचरांचे प्रचंड मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

या घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी जुन्नरचे तहसीलदार रणजित भोसले यांच्याशी संपर्क साधला.

तहसीलदारांनी तत्काळ मंडळाधिकारी आणि तलाठी यांना घटनास्थळी जाऊन पंचनामा करण्याचे आदेश दिले.या घटनेनंतर तहसीलदार रणजित भोसले यांनी नागरिकांना आवाहन करताना सांगितले, ज्या घरांच्या भिंतींना तडे गेले आहेत किंवा घरे धोकादायक अवस्थेत आहेत,अशा कुटुंबांनी तातडी ने सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे.योग्य वेळी खबरदारी घेतल्यास अशा दुर्घटनाटाळता येऊ शकतात.आणि भात खाचरांचे झालेल्या नुकसानी चे प्रत्यक्ष नुकसान स्थळांवर जाऊन पंचनामे करण्याचे आदेश संबंधित तलाठयांना दिले आहेत.


संस्थापक संघटक
मा.श्री.संजय भोकरे
राष्ट्रीय अध्यक्ष
मा.श्री.अशोकराव वानखेडे
प्रदेश अध्यक्ष
मा.श्री.निलेश सोमाणी
राज्य समन्वयक
श्री. नितीन शिंदे
संकल्प असावेत
नवे तुमचे मिळाव्यात
त्यांना नव्या दिशा
प्रत्येक स्वप्न पूर्ण
व्हावे तुझेप्राच
वाढदिवसाच्या
शुभेच्छा..!
सोशल मिडीया प्रदेश अध्यक्ष
श्री.सिध्दार्थ भोकरे
प्रदेश संपर्क प्रमुख
मा.श्री.वैभव स्वामी
इलेक्ट्रॉनिक मिडीया प्रदेश अध्यक्ष
श्री.अतुल परदेशी
आरोग्य सेल प्रदेश अध्यक्ष
मा.श्री.अमितकुमार खाडे
राज्य निवड समिती अध्यक्ष
मा.श्री.रुपेश पाडमुख
प्रवक्ते
मा.श्री.रमेश डोंगरे
सांस्कृतिक विभाग अध्यक्ष प्रदेश अध्यक्ष
श्री.संदिप भटेवरा
कायदेविषयक सल्लागार
ॲड.रचना भालके
प्रदेश प्रसिध्दी प्रमुख
मा.श्री.नवनाथ जाधव
मा. सुभाष विशे
महा.रा.प.संघाचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य तथा जेष्ठ पत्रकार
यांना
वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
श्री.रमजान मन्सुरी
गुजरात प्रदेश अध्यक्ष
श्री.मनिष महाजन
मध्यप्रदेश अध्यक्ष
राजश्री चौधरी
दिल्ली प्रदेश अध्यक्ष
श्री.आबा खवणेकर
गोवा प्रदेश संपर्क प्रमुख
श्री.रघुनाथ सोनवणे
दिल्ली प्रदेश संपर्क प्रमुख
प्रदेश कार्यकारिणी सदस्य/ विभागीय अध्यक्ष
शुभेच्छूक :-
सौ.सुरेखा खानोरे (सचिव), श्री.नितीन जाधव (मंत्रालय संपर्क प्रमुख),
श्री.नयन मोंढे (विदर्भ प्रमुख), श्री.सुनील फुलारी (अमरावती विभाग अध्यक्ष),
श्री.शैलेश पालकर (कोकण विभागीय अध्यक्ष), श्री.अनिल सावंत (मराठवाडा विभागीय अध्यक्ष),
श्री.अनुपकुमार भार्गव (नागपूर विदर्भ प्रमुख), श्री.भुवनेश दुसाने (उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष),
श्री.प्रशांत कांबळे (मुंबई), श्री.सुरेश खोसे (अहिल्यानगर), श्री.स्वामीराज गायकवाड (सोलापूर),
श्री.संग्राम मोरे (नांदेड),
श्री.स्वामी शिरकुल (मुंबई), श्री.सुभाष विसे (ठाणे), श्री.बाजीराव फराकटे (कोल्हापूर),
श्री.अनिल रहाणे (अहिल्यानगर), कु.श्रध्दा ठोंबरे (बदलापूर), श्री.पराग कुंकूलोळ (पिंपरी चिंचवड),
श्री.लक्ष्मण डोळस (नाशिक), श्री.सिताराम गावडे (सिंधूदुर्ग), श्री.अरुण लोखंडे (तुळजापूर),
श्री.शरद नागदेवे (नागपूर), श्री.रुपेश पाडमुख (नांदेड), प्रभू गोरे,
श्री.सुभाष डोके (प्रदेश का. सदस्य), श्री.राजेंद्र कोटे पाटील (पंढरपूर),
श्री.कुंडलिक वाळेकर (औरंगाबाद),श्री.रवींद्र गुरव (नंदुरबार), श्री.अबरार मिर्झा (जळगाव),
श्री.संतोष खालकर (सातारा), श्री.पंकज सोनवणे (वाशिम), प्रा.जसपाल सिंह सिसोदिया (धुळे),
श्री.संजोग काळदंते (पश्चिम महाराष्ट्र सचिव), श्री.नाविद अहमद (हिंगोली), विकास कदम (सातारा)
मा.श्री.अशोक देडे
प्रदेश उपाध्यक्ष
मा.श्री.महेश पानसे
प्रदेश उपाध्यक्ष
मा.श्री.अभयकुमार दांडगे
प्रदेश उपाध्यक्ष
मा.श्री.किशोर रायसाकडा
प्रदेश उपाध्यक्ष
महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ: मुंबई
महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ: मुंबई
संघटनेचे सर्व जिल्हा पदाधिकारी, तालुकाध्यक्ष व सभासद
डॉ. श्री. विश्वासराव आरोटे
पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा
दै. स. गांवकरीचे संपादक